
शुक्रवार, ३ डिसेंबर २०२१
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक १३६
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

रायगडातील अनेक शिक्षक लसीकरणासाठी उदासीन/२
राष्ट्रवादीविरोधात शिवसेना, काँग्रेसने ठोकले शड्डू/५
रायगडच्या विघ्नेश पाटीलची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड/६

## राज्य शासनाकडून विमान प्रवासासंदर्भातील नियमात बदल



**मुंबई :** ओमायक्रॉन व्हेरियेंटच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्य शासनाने विमान प्रवासासंदर्भात नियमावली जाहीर केली होती. त्यानुसार इतर राज्यांतून महाराष्ट्रात दाखल होणाऱ्या विमान प्रवाशांनी दोन्ही डोस घेतलेले आवश्यक; अन्यथा ४८ तासांपूर्वी आरटी-पीसीआर चाचणी बंधनकारक करण्यात आली होती, पण आता राज्य शासनाने या नियमावलीत बदल केला आहे. नव्या नियमावलीनुसार ४८ तासांऐवजी ७२ तासांपूर्वीची आरटी-पीसीआर चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे. राज्याने काढलेल्या नव्या नियमावलीत हाय रिस्क देशांच्या यादीत तीन देशांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी यामध्ये सहा देशांचा समावेश होता. नव्या नियमावलीनुसार तीन देशांमध्ये दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना आणि झिम्बाब्वे या देशांचा समावेश आहे.

# ‘ओमायक्रॉन’चा भारतात शिरकाव

## कर्नाटकमध्ये आढळले दोन रुग्ण; आरोग्य यंत्रणा सतर्क

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जगभरात कोरोनाबाबत नव्याने धास्ती निर्माण करणारा ओमायक्रॉन व्हेरियेंट अद्याप भारतापासून दूर असल्यामुळे देशातील नागरिक निर्धास्त होते, मात्र भारतीयांची ही निश्चिंतता अल्पजीवी ठरली आहे. कारण भारतात कर्नाटकमध्ये ओमायक्रॉनचे दोन रुग्ण आढळल्याची माहिती केंद्रीय आरोग्य विभागाचे सहसचिव लव अग्रवाल यांनी गुरुवारी (दि. २) येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.





अवघ्या दोनच दिवसांपूर्वी केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत बोलताना देशात एकही ओमायक्रॉनचा रुग्ण नसल्याची माहिती दिली होती. त्यामुळे दक्षिण अफ्रिका आणि इतर काही देशांमध्ये आढळलेला हा कोरोनाचा नवा व्हेरियेंट भारतापासून अद्याप दूर असल्याचा दिलासा देशवासीयांना मिळाला होता, मात्र केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने बुधवारी पत्रकार परिषद घेऊन कर्नाटकमध्ये दोन रुग्णांमध्ये ओमायक्रॉन विषाणू आढळल्याची माहिती दिली. आतापर्यंत २९ देशांमध्ये ‘ओमायक्रॉन’ची लागण झालेले एकूण ३७३ रुग्ण आढळल्याचेदेखील आरोग्य मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, कर्नाटकमध्ये आढळलेले ओमायक्रॉनचे दोन्ही रुग्ण हे परदेशी नागरिक असल्याची माहिती मिळत आहे. या दोघांचे वय ६६ वर्षे आणि ४६ वर्षे असे असून त्यांच्या संपर्कात आलेल्या सर्वांची चौकशी करून त्यांची चाचणी करण्यात येत असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, ओमायक्रॉनचा संसर्ग आढळून आलेल्या दोघांमध्ये कोरोनाची अत्यंत सौम्य लक्षणे असून कोणतीही गंभीर लक्षणे दिसत नसल्याची माहितीदेखील देण्यात आली आहे.

ओमायक्रॉनचे दोन रुग्ण सापडल्यामुळे घाबरून जाण्याची आवश्यकता नसल्याचे सहसचिव लव अग्रवाल यांनी सांगितले. घाबरून जाण्याची आवश्यकता नसली तरी सतर्क राहाणे आवश्यक आहे. कोविडचे नियम पाळणे आणि गर्दी टाळणे हे महत्त्वाचे आहे, असेही अग्रवाल या वेळी म्हणाले.

## काँग्रेसला सल्ला देण्याइतकी नवाब मलिकांची पात्रताच नाही

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मुंबई दौऱ्यात काँग्रेसवर केलेल्या टीकेनंतर सहकारी पक्षांनीही काँग्रेसला लक्ष्य केले आहे. यावरून राज्यात काँग्रेस नेत्यांनी नाराजीचा सूर लावला आहे.

भाजपविरोधात कोणी लढण्यास तयार नसल्यास किंवा सारखे परदेशात जात असल्यास आम्ही तरी काय करणार, असा सवाल करीत ममतादिदींनी बुधवारी काँग्रेस नेते राहुल गांधी



**बाळासाहेब थोरात संतापले**

यांच्यावर निशाणा साधला होता. यूपीएचे अस्तित्व आहेच कुठे, असेही त्या या वेळी म्हणाल्या होत्या.

ममता बॅनर्जींच्या या टीकेवर राज्यातील काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी प्रतिक्रिया दिली असून काँग्रेस हा फक्त पक्ष नाही तर विचार आहे. अशा वक्तव्यांनी आम्ही अस्वस्थ होणार नाही, असे एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले आहे.

दरम्यान, थोरात यांना या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी वास्तव स्वीकारण्यासंबंधी दिलेल्या सल्ल्याबाबत विचारण्यात आले असता ते म्हणाले की, नवाब मलिकांनी काँग्रेसला सल्ला द्यावा हे काही योग्य नाही. काँग्रेसला सल्ला द्यावा अशी त्यांची पात्रताच नाही.

## किरण गोसावीला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

आर्यन खान प्रकरणात अमली पदार्थविरोधी दलाचा (एनसीबी) साक्षीदार असलेल्या किरण गोसावीला पालघर पोलिसांनी अटक केली आहे. फसवणुकीच्या गुन्ह्याखाली गोसावीला अटक करण्यात आली आहे.



यापूर्वी गोसावीला एका फसवणुकीच्याच प्रकरणात पुणे पोलिसांनी अटक केली होती. गेल्या महिन्यात त्याला पुण्यातील स्थानिक न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती. गोसावी ११ नोव्हेंबरपासून लष्कर पोलीस ठाण्याच्या पोलीस कोठडीत होता. त्यापूर्वी त्याला फरासखाना पोलीस ठाण्यात अशाच एका प्रकरणात अटक करून १२ दिवस कोठडीत ठेवण्यात आले होते. गोसावी याच्यावर पुण्यातील फरासखाना, लष्कर, पुणे शहरातील वानवडी पोलीस ठाण्यात आणि पिंपरी चिंचवडच्या भोसरी पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा असे एकूण चार गुन्हे दाखल आहेत.

## लोकनेत्याचा सत्कार



**पनवेल : तालुक्यातील न्हावे येथील श्री वाघदेवी मंदिराचे बांधकाम नुकतेच झाले असून या मंदिराच्या बांधकामासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आर्थिक मदत केली होती. त्याबद्दल श्री वाघदेवी प्रासादिक भजन मंडळाच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा गुरुवारी सत्कार करण्यात आला. या वेळी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, भजन मंडळाचे अध्यक्ष हिरालाल पाटील, ग्रामसुधारक मंडळाचे माजी अध्यक्ष उत्तम म्हात्रे, गणेश ठाकूर उपस्थित होते.**

## माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह निलंबित



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ आयपीएस अधिकारी परमबीर सिंह यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. बेशिस्त वर्तन आणि अनियमिततेचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

मार्च २०२०मध्ये मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात परमबीर सिंह यांनी राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल देशमुख यांनी सचिन वाझे आणि इतर दोन पोलीस अधिकाऱ्यांना शहरातील बारमालकांकडून महिन्याला १०० कोटी वसूल करण्याचा आदेश दिला होता, असा गंभीर आरोप करीत खळबळ माजवून दिली होती. परमबीर सिंह यांच्या पत्रानंतर देशमुख यांची गृहमंत्रिपदावरून गच्छंती झाली. सध्या ते जेलमध्ये असून विविध तपास यंत्रणांकडून त्यांची चौकशी सुरू आहे.

## निवडक

### अयोध्येत बॉम्बस्फोटाची धमकी; हाय अलर्ट जारी

**अयोध्या :** अज्ञात व्यक्तीने अयोध्येत बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिली आहे. बॉम्बस्फोटाच्या धमकीनंतर उत्तर प्रदेश पोलीस हाय अलर्टवर आहेत. पोलिसांनी अयोध्येचे प्रवेशद्वार, हॉटेल्स, धर्मशाळा, तसेच रेल्वे व बसस्थानकांवर सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे.

### कोल्हापूरचे काँग्रेस आमदार चंद्रकांत जाधव यांचे निधन

**कोल्हापूर :** येथील काँग्रेसचे आमदार चंद्रकांत जाधव यांचे हैदराबादमधील रुग्णालयात निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.



### देशाच्या पूर्व किनारपट्टीवर जवाद चक्रीवादळाची शक्यता

**कोलकाता :** देशाच्या काही भागांत अवकाळी पाऊस पडत असताना पूर्व किनारपट्टीवर जवाद चक्रीवादळ घोंगावण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, ओडिशाच्या किनारी जोरदार वारा-पावसाची शक्यता आहे.

## शिवसेनेचा पासिंग स्ट्राईक रेट कमी होता

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या मुंबई दौऱ्यावरून सध्या राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. आता विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेचा पासिंग स्ट्राईक रेट हा आमच्यापेक्षा कमी होता, अशी आठवण करून देत टोला लगावला आहे.

पश्चिम बंगालच्या मुद्द्यावरून संजय राऊत यांनी भाजपवर टीका केल्यानंतर त्यावर फडणवीसांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत इतक्या मोठ्या बाता करतायत, त्यांचे किती आमदार निवडून आले? ५६ निवडून आले आहेत. त्यांचा ४०-४२ टक्के असा पासिंग स्ट्राईक रेट होता. आमचा ७० टक्के होता. त्यामुळे कुणाला महाराष्ट्रातील

### फडणवीसांचा टोला



लोकांनी पळवून लावले हे निवडणुकीतून स्पष्ट झालेय, ते पुढच्या निवडणुकीतही स्पष्ट होईल, असे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, भाजपविरोधी विरोधकांची आघाडी करण्याच्या प्रयत्नांवर आणि शिवसेनेच्या त्याला समर्थनावरदेखील फडणवीसांनी अप्रत्यक्षपणे टीकास्त्र सोडले. मला वाटते की संजय राऊत असतील किंवा शिवसेना असेल यांनी कितीही लांगुलचालन केले तरी त्यांना फायदा होणार नाही, पण एक चांगलंय की, आता मतांच्या लाचारीमध्ये त्यांना हिंदुत्वविरोधी पक्षांना डोक्यावर घेऊन हिंडावे लागतेय. हा त्यांचा खरा चेहरा आता उघड झाला आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले.

माफी मागायला मी सावरकर नाही या शिवसेना खासदार प्रियांका चतुर्वेदी यांच्या विधानावरूनही फडणवीसांनी शिवसेनेला लक्ष्य केले. शिवसेनेचे बेगडी सावरकर प्रेम आता पूर्णच उघड झाले आहे. आतापर्यंत त्यांच्या मित्रपक्षांचे लोक रोज सावरकरांना शिव्या द्यायचे. आता त्यांचे स्वतःचे खासदार असे म्हणतायत. सावरकरांना भारतरत्न नका देऊ, ते पर्मनंट भारतरत्न आहेत, पण किमान त्यांचा अपमान करू नका. यातून त्यांचे बेगडी प्रेम लक्षात येतेय आणि जनतेला ते मान्य नाही, असे फडणवीस म्हणाले.

## आजपासून नाशकात मराठी साहित्य संमेलन

### पावसामुळे काही कार्यक्रम होणार बंदिस्त सभागृहात

**नाशिक :** साहित्यिक आणि रसिकांचा कुंभमेळा म्हणून ओळखले जाणारे यंदाचे ९४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन शुक्रवार (दि. ३)पासून कविवर्य वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या नाशिक नगरीत होत आहे, मात्र पावसाने यामध्ये खोडा घातला असून काही कार्यक्रम आता बंदिस्त सभागृहात घेण्यात येणार आहेत. संमेलन तोंडावर आले असताना अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने संयोजकांची तारांबळ उडाली आहे. असे असले तरी ३ ते ५ डिसेंबर या कालावधीत साहित्य संमेलनात वेगवेगळ्या कार्यक्रमांची पर्वणी साहित्य रसिकांना मिळणार आहे.

## कोशिश फाऊंडेशनच्या स्नॅपशॉट फोटोग्राफी, पोस्टर आणि ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या वतीने दीपावलीचे औचित्य साधून स्नॅपशॉट फोटोग्राफी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा आणि ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

कोशिश फाउंडेशनतर्फे पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांसाठी दिवाळीत पोस्टर स्पर्धा व स्नॅपशॉट फोटोग्राफी स्पर्धा पर्व-२ ही स्पर्धा ये दिवाली शांतीवाली, दिवाली थ्रु माय लेन्स आणि वोकल फॉर लोकल या विषयांवर घेण्यात आली. स्नॅपशॉट फोटोग्राफी स्पर्धा मोबाइल आणि कॅमेरा या दोन गटांत



घेण्यात आली. पोस्टर आणि वक्तृत्व स्पर्धा ध्वनिप्रदूषण, ये दिवाली शांतीवाली आणि वोकल फॉर लोकल या विषयांवर चार वयोगटात घेण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल सोमवारी (दि. २९) कोशिश फाउंडेशनतर्फे जाहीर करण्यात आला.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे**

**स्नॅपशॉट फोटोग्राफी**

**ये दिवाली शांतीवाली**

श्रेणी-कॅमेरा फोटोग्राफी : प्रथम क्रमांक अनिकेत गावडे, द्वितीय कविता सिंग, तृतीय मनीष देव, श्रेणी-मोबाइल फोटोग्राफी : प्रथम क्रमांक अथर्व गायकवाड, द्वितीय प्रतिक कदम, तृतीय तेजस नाले. विषय वोकल फॉर लोकल श्रेणी-कॅमेरा फोटोग्राफी : प्रथम हर्ष पाटकर, द्वितीय लक्ष्मण ठाकूर श्रेणी-मोबाइल फोटोग्राफी : प्रथम क्रमांक दिनेश पटोले, द्वितीय लाजरस पॉल.

**पोस्टर स्पर्धा वोकल फोर लोकल**


वयोगट ७ वर्षाखालील : प्रथम रुद्राणी पारकर, द्वितीय स्वरदा उपाध्याय, वयोगट ८ ते १५ वर्ष : प्रथम दिशांत महाडिक व अवधूत चव्हाण, द्वितीय विग्नेश शाहू व नयन मुंढेकर, वयोगट १६ ते २१ वर्ष : प्रथम केविन डायस, द्वितीय शाहू सलागरे, तृतीय रिया करण, वयोगट २२ वर्षावरील : प्रथम रुद्रतेज शेटे, द्वितीय सतीश माने. (पान २ वर..)

## विवेक पाटील जामीनप्रकरणी आज पुन्हा सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेले कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी शुक्रवारी (दि. ३) पुन्हा होणार आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांच्या न्यायालयासमोर गुरुवारी (दि. २) सुनावणी झाली. या सुनावणीसाठी विवेक पाटील यांना न्यायालयात हजर करण्यात आले नव्हते, मात्र त्यांच्या वतीने वकील राज मुंदरगीऐवजी वकील पवनी चढा यांनी न्यायालयाकडे उद्याची तारीख मिळावी, अशी विनंती केली. न्यायालयाने ही विनंती मान्य केल्याने आता शुक्रवारी पुन्हा सुनावणी होणार आहे.



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. ३ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१५. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- टेंभोडे, रा.जि.प. शाळा
- भोईरपाडा रा.जि.प. शाळा
- देवीचापाडा, रा.जि.प. शाळा
- फणसवाडी
- हैदरवाडी मंदिर
- तोंडरे वरचा पडा, रा.जि.प. शाळा
- पेठाली, रा.जि.प. शाळा
- भिंगारी, रा.जि.प. शाळा
- कांदेवाडी
- नागझरी, रा.जि.प. शाळा

# रायगडात अनेक शिक्षक लसीकरणासाठी उदासीन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १ डिसेंबरपासून बहुतांश शाळा सुरू झाल्या आहेत, मात्र कित्येक शिक्षकांनी लसच घेतलेली नाही. ज्या शिक्षकांनी लस घेतली नाही त्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.



(प्रातिनिधिक छायाचित्र)

राज्यातील ग्रामीण भागातील पहिली ते चौथी आणि शहरी भागातील पहिली ते सातवीचे वर्ग १ डिसेंबरपासून सुरू करण्याची घोषणा राज्य सरकारने केली. त्यात शाळांचे निर्जंतुकीकरणाबरोबरच शिक्षकांचे कोविड लसीकरण आणि आरटीपीसीआर चाचणी ही प्रमुख अट शाळा सुरू करण्यासाठी घातली आहे. या अटींच्या अधीन राहून रायगड जिल्ह्यातील दोन हजार ६७३ पैकी दोन हजार ४९७ शाळा सुरू झाल्या.

शाळा सुरू झाल्यानंतर याबाबतचा अहवाल रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने तयार केला आहे. त्यानुसार सात हजार १६३ शिक्षकांपैकी सात हजार २५ शिक्षक शाळेत हजर झाले. त्यातील सहा हजार ६८४ शिक्षकांनी कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत, तर तीन हजार ८२२ शिक्षकांनी पहिला डोस घेतला आहे. शिक्षण विभागाच्या अहवालानुसार केवळ ६४ शिक्षकांनी लशीचा एकही डोस घेतलेला नाही, परंतु शिक्षण विभागाने दिलेली आकडेवारी फसवी आणि डोळ्यात धूळफेक करणारी असल्याचे हा अहवालच सांगतो आहे. त्यामध्ये एकूण शिक्षकांच्या संख्येपेक्षा लस घेतलेल्या शिक्षकांची संख्या खूपच अधिक दाखवण्यात आली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने ही आकडेवारी पंचायत समिती स्तरावरून मागवलेली आहे. दुसरीकडे ज्या शाळा सुरू झालेल्या नाहीत त्यातील शिक्षकांच्या लसीकरणाची माहितीच शिक्षण विभागाकडे नाही. शिवाय त्या शाळा का सुरू होऊ शकल्या नाहीत याबाबतचे स्पष्टीकरणही शिक्षण विभागाकडून दिले जात नाही. त्यामुळे कोविड आजाराबाबत शिक्षण विभाग किती उदासीन आहे हे दिसून येते.

राज्यात जानेवारी महिन्यात कोविड प्रतिबंधक लसीकरण सुरू झाले. नागरिकांना लसीकरणासाठी प्रवृत्त करण्यात जिल्ह्यातील शिक्षकांचा मोठा सहभाग होता. असे असताना अनेक शिक्षक आजही लसीकरणापासून दूर असल्याचे चित्र रायगड जिल्ह्यात समोर

**“ज्या शिक्षकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा एकही डोस घेतलेला नाही, तसेच ज्या शिक्षकांनी लसीचा पहिला डोस घेतला आहे, मात्र दुसरा डोस मुदत उलटूनही घेतलेला नाही त्यांनी डोस घेणे बंधनकारक आहे. याबाबत शिक्षकांना सूचित करण्यात आले असून, जे शिक्षक लसीचा डोस घेण्यास टाळाटाळ करतील त्यांच्या विरोधात प्रशासकीय कारवाई करण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल.**

**–डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

आले आहे. आता लसीकरणापासून दूर आणि बेफिकीर असलेल्या शिक्षकांना शिक्षण विभागाने नोटिसा बजावल्या आहेत. कारणांसह सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

# सिडकोविरोधात सोमवारी टाळे बंद आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील नागरिक सिडकोच्या बेजबाबदारपणाच्या वृत्तीला वैतागले असून, समस्या सोडवण्यासाठी सिडको प्रशासन असमर्थ आहे. त्यामुळे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. ६) नवीन पनवेल येथील सिडको कार्यालयाला टाळे बंद आंदोलन करून सिडको प्रशासनाला जागे करण्याचे काम सर्व नगरसेवक करणार असल्याचे नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ यांनी गुरुवारी (दि. २) सांगितले.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे सत्ताधारी नगरसेवक नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम करत आहेत, मात्र सिडको अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाची वागणूक नागरिकांच्या त्रासात आणखी भर घालत आहे. प्रभाग क्रमांक १७मध्ये सिडकोच्या या

**“आमदार प्रशांत ठाकूर सिडकोचे अध्यक्ष असताना सर्व कामे सुरळीतपणे सुरू होती. सिडकोने पाच उद्याने महापालिकेकडे हस्तांतरित केली आहेत. त्या उद्यानांमध्ये विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू झाले आहे. वारंवार तक्रार करूनही सिडको प्रशासनाला जाग येत नसेल, तर येत्या ६ डिसेंबरला सिडको कार्यालयाला टाळे बंद आंदोलन करू.**

**–अॅड. मनोज भुजबळ, नगरसेवक**

दुर्लक्षामुळे नागरिक हैराण झालेत. सिडकोने पाइपलाइनसाठी केलेले खोदकाम केले होते. त्यानंतर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी निकृष्टदर्जाचे काम केले. त्यामुळे रस्त्याची दुर्दशा झाली असून, अनेक वेळा या खड्ड्यांमध्ये पडून नागरिकांना दुखापत झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहे.

सिडकोकडे वारंवार तक्रार करूनही ही समस्या सोडवण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देत महापालिकेकडे ही प्रक्रिया हस्तांतरीत करणार आहोत, अशा शब्दांत हात झटकण्याचे काम अधिकाऱ्यांमार्फत सुरू आहे, तसेच पाणीपुरवठा पुरेशा दाबाने होत नसल्यामुळे नागरिकांचे पाण्यावाचून हाल होत आहेत, तसेच वारंवार तक्रार करूनही ड्रेनेज लाईन तुंबवण्याची समस्या जैसे थे तशाच परिस्थितीमध्ये असून, परिसरात दुर्गंधी परसत आहे. उद्यानांमध्ये लाईटचे खांब बंद अवस्थेत आहेत. रात्रीच्या वेळी उद्यानात दारू पिणारे बसतात त्यातच उद्यानात वॅचमेन नेमला नसल्याने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, तसेच हायमास्टही बंद अवस्थेत आहेत. मागील वर्षी वादळात पडलेला खांब आजतागायत तशाच परिस्थितीत आहे. या सर्व समस्यांबाबत सिडको अधिकाऱ्यांना सांगितले असता ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत.


# किल्ले रायगडावर राष्ट्रपतींसाठी हेलिपॅड सज्ज

**महाड : प्रतिनिधी**

देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्यासाठी किल्ले रायगडावर हेलिकॉप्टर उतरविण्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात आली आहेत. एकूण सहा ठिकाणी हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

अखंड महाराष्ट्रासह देशाचे स्फूर्तिस्थान असलेल्या किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी राष्ट्रपती रामनाथ कोविंद ६ डिसेंबर रोजी रायगडावर येत आहेत. ते देशाचे दुसरे राष्ट्रपती आहेत की जे रायगडावर येत आहेत. ही महाडकरांसाठी आणि समस्त शिवभक्तांसाठी अभिमानाची बाब आहे. राष्ट्रपतींसाठी किल्ले रायगडावरील होळीचा माळावर हेलिपॅड करण्यात आले असले, तरी तेथील महाराजांचा पुतळा झाकला जाणार असल्याचे खासदार संभाजीराजे यांच्या यंत्रणेकडून सांगण्यात आले आहे. याशिवाय पाचाड येथे अतिरिक्त पाच हेलिपॅड तयार करण्यात आली आहेत.

**सहा ठिकाणी व्यवस्था**



**राष्ट्रपतींचा दौरा शिवभक्तांसाठी आनंददायी बाब –संभाजीराजे**

***गडसंवर्धनाच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी राष्ट्रपती रामनाथ कोविंद किल्ले रायगडावर येत आहेत. ही सर्व शिवभक्तांसाठी आनंददायी बाब आहे, असे खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.***

# कमिशनचे आमिष दाखवून तरुणाला गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पेडोंरा अॅपच्या माध्यमातून घरी बसल्या नोकरी करून जास्त लाभ मिळविण्याचे आमिष दाखवून एका सायबर चोरट्याने पनवेलच्या डेरवली येथील एका तरुणाला तब्बल १० लाख १८ हजार रुपयांना गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या प्रकरणी सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेत फसवणूक झालेला तरुण सनाऊल्ला जबीउल्ला खान (वय २५) मुंब्रा येथे राहण्यास असून त्याचा पनवेलमधील डेरवली येथे फॅब्रिकेशनचा व्यवसाय आहे. खान यांना सायबर चोरट्याने विनीता या महिलेच्या नावाने त्याला घरी बसून नोकरी करा आणि मिळणाऱ्या लाभाचा फायदा घ्या, अशा प्रकारचा व्हॉट्सअॅपवरून मेसेज पाठविला. या मेसेजला खान याने प्रतिसाद दिल्यानंतर चोरट्याने त्याला एक लिंक पाठवून दिली. ही लिंक उघडण्यात आल्यानंतर पॅडोंरा नावाचे अॅप सुरू झाले. या अॅपच्या माध्यमातून कमिशन मिळणार असल्याचे समजल्यावर खान यांनी चोरट्याने सांगितल्याप्रमाणे रुपये गुंतवले. त्यानंतर कमिशनची रक्कम निघत नसल्याने आपली फसवणूक होत असल्याचे खान याच्या लक्षात आले. त्यानंतर खान याने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



**पनवेल : सावळे ग्रामपंचायतीचे सदस्य तथा भाजप गुळसुंदे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष सुनील माळी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व ओबीसी सेल तालुका सरचिटणीस रोशन पाटील.**

# ‘लोकमान्य’च्या भाग्योदय ठेव योजनेला प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपास आलेली व आकर्षक व्याज दर देणारी लोकमान्य मल्टिपर्पज को–ऑप सोसायटी आपल्या सभासदांकरिता नेहमीच नव नवीन ठेव योजना अंमलात आणते. त्याच अनुषंगाने लोकमान्य भाग्योदय योजनेस सुरुवात झाली आहे.

सभासद व ग्राहकांशी विचारविनिमय करून व त्यांच्या सूचनांच्या विचार करून लोकमान्य सोसायटीने लोकमान्य भाग्योदय योजना चालू केली आहे. ही ठेव योजना २५ महिन्यांच्या कालावधीसाठी असून या योजनेत भाग घेण्यासाठी सभासदाने कमीतकमी ३१,२५० रुपये व त्यापटीत गुंतवावे लागतील. सभासद जास्तीत जास्त कितीही रक्कम गुंतवू शकतील. लोकमान्य भाग्योदय योजनेत ८.८५ टक्के व्याज दर मिळेल. वरिष्ठ नागरिकांना अर्धा टक्के अधिक व्याज दर मिळतो. या योजनेत सभासद आपल्या पाल्यांच्या नावेही ठेव ठेऊ शकतात. लोकमान्य भाग्योदय योजनेत काही नियम व अटींवरती ९० टक्क्यांपर्यंत कर्जाची सुविधा आहे, तसेच योजनेतून मुदत पूर्व ठेव काढण्याचीही काही नियम व अटींवर तरतूद आहे.

अधिक माहितीसाठी नजीकच्या लोकमान्य मल्टिपर्पज को–ऑप सोसायटीच्या शाखेत संपर्क साधावा. लोकमान्य सोसायटीच्या २१३ शाखा कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा व दिल्ली येथे कार्यरत आहेत. लोकमान्य भाग्योदय योजना ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत कार्यान्वित आहे.

# खारघरमध्ये घनकचरा व्यवस्थापन वर्गीकरण कार्यशाळा

**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर येथील रघुनाथ विहार या ठिकाणी गुरुवारी (दि. २) घनकचरा व्यवस्थापन, वर्गीकरण बाबत कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी निसर्गगुण या बायोगॅस् संयंत्राचे जनक आणि भाभा ऑटोमिक संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन ही आज काळाची गरज बनली आहे. आपल्या मूलभूत गरजांमध्ये घनकचरा व्यवस्थापन हीसुद्धा एक भाग बनली आहे. आपल्या घरामध्ये दैनंदिन निर्माण होणारा कचरा घराबाहेर जाणार नाही, याची दक्षता प्रत्येक गृहिणीने घेतली




पाहिजे. निसर्ग हीच खरी संपत्ती आहे. निसर्गाचे जतन करणे, हा एकमेव पर्याय माणसाकडे उपलब्ध आहे. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ३० टक्के कचरा हा स्वयंपाक घरातील आणि वाया गेलेल्या अन्नाचा असतो. त्यामुळे अन्न वाया घालवू नये, हे संस्कार प्रत्येक गृहिणीने आपल्या मुलांना दिले पाहिजे, जेणेकरून कचरा उत्पत्ती कमी होण्यास मदत होईल.

आयुक्त गणेश देशमुख यांनी घनकचरा व्यवस्थापन व वर्गीकरणाबाबत माहिती दिली, तसेच स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांमध्ये जनजागृती करून स्वच्छतेच्या सवयी अंगी बिंबविण्यासाठी नागरिकांना आवाहन केले.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ची प्रभावी अमलबजावणी पनवेल महापालिका क्षेत्रात सुरू आहे. या अंतर्गत जनजागृतीपर ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

या वेळी उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त रामदास कोकरे, सहायक आयुक्त डॉ. वैभव विधाते, बिर्ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पाटील, तसेच महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत याच पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन व वर्गीकरण बाबतची दुसरी कार्यशाळा आरएएफ बटालियन कॅम्प, खारघर येथे घेण्यात आली. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग घेतला.

# सक्रिय कुष्ठरोग व क्षयरोग शोध मोहिमेची दुसरी फेरी जाहीर

**पनवेल :** राष्ट्रीय कुष्ठरोग व क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सक्रिय कुष्ठरोग व क्षयरोग शोध मोहिमेची दुसरी फेरी पनवेल महापालिका क्षेत्रातील सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १ डिसेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत राबविण्यात येणार आहेत. यात घरोघरी जाऊन सर्वेक्षण होणार आहे. नागरिकांनी घरी येणाऱ्या स्वयंसेवकांना सहकार्य करावे व तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पान १ वरून

## कोशिश फाऊंडेशनच्या विविध स्पर्धांचा निकाल जाहीर

**ये दिवाली शांतीवाली**

वयोगट ७ वर्षाखालील : प्रथम क्रमांक अक्षिता पांडे, द्वितीय अक्षरा अविनाश कांबळे, तृतीय जष्किर्ती घाडगे, वयोगट ८ ते १५ वर्ष : प्रथम श्रावणी माने, द्वितीय वेदांती थळे, तृतीय आर्यन जाधव, वयोगट १६ ते २१ वर्ष : प्रथम प्रियांका मोरे, द्वितीय नीलम पाटील, तृतीय सारा नाईक, वयोगट २२ वर्षावरील : प्रथम तेजस म्हात्रे, द्वितीय कविता वायंगणकर.

**वक्तृत्व स्पर्धा**

वयोगट ७ वर्षाखालील : प्रथम क्रमांक अद्विका गोसावी, द्वितीय कायान मैत्री, तृतीय दुर्वा निंबाळकर, वयोगट ८ ते १५ वर्षे : प्रथम शुभम चौबे, द्वितीय अपूर्वा गोस्वामी, आदित्य सुराणा, अबोली पवार, तृतीय प्राची तालबघे, विनेश ढमाळ, वयोगट १६ ते २१ वर्ष : प्रथम कृष्णाली जोशी द्वितीय सृष्टी कांबळे, तृतीय ऊर्वशी ठाकूर, वयोगट २२ वर्षावरील : प्रथम प्रियंका शेरावत, द्वितीय श्वेता बांठिया, तृतीय साहित्य देशमाने.

# एड्स प्रतिबंधक दिनानिमित्त मार्गदर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक एड्स दिनानिमित्त श्री समर्थ सामाजिक संस्थेंतर्गत कोरोना नियमांचे पालन करून जनजागृती कार्यक्रम वाशिवली येथे राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थी पदरॅली व परिसरातील शाळांमधील आठवी ते बारावीमधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्यानामार्फत एड्स–कोरोनाबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.




दरवर्षी परिसरातील गावांमध्ये पथनाट्याच्या माध्यमांद्वारे जागृती करण्यात येत असते, परंतु या वेळी ‘ओमायक्रोन’ विषाणूचे संकट विचारात घेता गर्दीचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. या वेळी जास्तीत जास्त किशोरवयींन मुलांना जागृत करण्याचा संस्थेचा मानस आहे. वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयात ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना एड्स व कोरोना आजाराबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी किशोरवयीन होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून एड्स आजाराबद्दलची संपूर्ण माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. परिसरातील सर्व शाळांमध्ये ही जागृती करण्यात येणार आहे.

जागतिक एड्स दिन २०२१ची थीम असमानता समाप्त करा. एड्स संपवा आणि महामारी संपवा, मागे राहिलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यावर विशेष लक्ष केंद्रित करून. ‘डब्ल्यूएचओ’ने असे म्हटले आहे की या वर्षीचा मुख्य अजेंडा जगभरातील आवश्यक एचआयव्ही सेवांमध्ये वाढती असमानता अधोरेखित करणे हा आहे. मानवी हक्कांबद्दलची विभागणी, असमानता आणि दुर्लक्ष हे अशा अपयशांपैकी एक आहेत ज्यामुळे एचआयव्ही हे जागतिक आरोग्य संकट बनू शकले आणि राहू दिले. ‘डब्ल्यूएचओ’ हेदेखील जोडते की आता कोविड १९ असमानता वाढवत आहे आणि सेवांमध्ये व्यत्यय आणत आहे. ज्यामुळे एचआयव्हीसह जगणाऱ्या अनेक लोकांचे जीवन अधिक आव्हानात्मक बनले आहे. ज्यांना सध्या आवश्यक एचआयव्ही सेवा मिळत नाहीत अशा लोकांपर्यंत पोहचण्यासाठी जनजागृतीचे आवाहन केले आहे.

जागतिक एड्स दिनाच्या या कार्यक्रमासाठी वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग आणि बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड यांचे सहकार्य मिळाले.

# ‘ओमायक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर उरणमध्ये प्रशासनाकडून खबरदारी

**उरण : वार्ताहर**

ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या प्रकाराला रोखण्यासाठी उरण तालुक्यात प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत आहे. गर्दीचे समारंभ, धार्मिक कार्यक्रमांवर बंधने घालण्यात येणार आहेत. कोरोनाचे नियमही कडक करण्यात येणार असून मास्क नसणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिले.

ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर उरण तालुक्यातील कोविड परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या वेळी समाधानाची बाब म्हणजे उरण तालुक्यात एक लाख ५५ हजार ५५५ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. यामध्ये दोन डोस घेतलेल्यांची संख्या एक लाख चार हजार १५७ एवढी आहे तर दोन डोस पूर्ण झालेले ५१ हजार ३९८ नागरिक आहेत.


लसीकरणात उरण तालुका हा रायगड जिल्ह्यात दुसरा आहे. पोलादपूर तालुक्यानंतर उरण तालुक्यात दोन डोस घेतलेल्यांची संख्या जास्त आहे.

ओमायक्रॉन या नवीन विषाणूच्या पार्श्वभूमीवर सगळीकडे सतर्कता बाळगण्यात येत असून उरण तालुक्यात खबरदारीचे उपाय राबवले जाणार आहेत. नागरिकांनी गर्दीचे समारंभ व कार्यक्रम टाळावेत. मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा. समारंभ आणि कार्यक्रमांमध्ये गर्दी होऊ नये यासाठी पोलीस आणि प्रशासनाला काळजी घेण्याचे आदेश देण्याच्या सूचना करण्यात आल्या असल्याचे तहसीलदार अंधारे यांनी सांगितले.

## सतीश खांबेटे

**दुखवटा**

**मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार व रशियन भाषेचे तज्ज्ञ सतीश खांबेटे (वय ६५) यांचे बुधवारी (दि. १) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई व विवाहित कन्या असा परिवार आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ, प्रेस क्लब, मंत्रालय आणि विधिमंडळ येथे सक्रिय असणारे खांबेटे यांनी ‘नवशक्ती’, ‘तरुण भारत’, बहुभाषिक वृत्तसंस्था, हिंदुस्थान समाचार, नियतकालिक, सोविएत देश अशा विविध माध्यमांमध्ये पत्रकारिता केली होती. त्यांची काही पुस्तकेही प्रसिद्ध झाली असून त्यांनी अनेकदा रशियाचा दौरा केला होता. ते रशियन भाषा शिकवत असत. खांबेटे यांची कन्या नियती ही रूईया महाविद्यालयात प्राध्यापिका आहे.



## निवडक



### उत्पत्ती एकादशीनिमित्त दिंडी सोहळा

**मोहोपाडा :** कार्तिक कृष्ण ११ उत्पत्ती एकादशीनिमित्ताने वावंढळ येथे भगवान श्री गणेश योगीराज महाराज वारकरी संप्रदायाचे प्रमुख हभप भिकाजी महाराज कदम यांच्या नेतृत्वाखाली दिंडी सोहळा झाला. कोरोनाच्या महामारीमुळे गेल्या वर्षी व याही वर्षी कार्तिक वारी पायी दिंडी सोहळा रद्द करून गावातच नगर प्रदक्षिणा करण्यात आली. यासोबत शासनाच्या नियमांचे पालन करून गेले सात दिवस अखंड हरिनाम कार्यक्रम झाला. मुंबई, कोल्हापूर, नवी मुंबई व परिसरातील वारकरी संप्रदायाचे अनेक अनुयायी, महिला व बाल वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अपघातात सुरक्षा रक्षकाचा मृत्यू

**पनवेल :** दुचाकीच्या झालेल्या अपघातात एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील डेरवली गाव ते पनवेल रस्त्यावर घडली आहे.




सुरक्षा रक्षकाचे काम करणारा जनक बडेला हा तरुण धर्मराज साई याच्यासोबत दुचाकीवरून येत होता. या वेळी रस्त्यात असलेल्या स्पीड ब्रेकरकडे दुर्लक्ष झाल्याने झालेल्या अपघातात जनक बडेजा गंभीररीत्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

### खारघरमध्ये सोनसाखळी लांबवली

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून दोघे जण दुचाकीवरून पसार झाल्याची घटना घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर १९ येथे राहणाऱ्या दया निलायम या त्या परिसरातून आरती डेअरीजवळून पायी जात होत्या. या वेळी त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी मोटरसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी खेचली व ते पसार झाले. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




### सॅनिटरी नॅपकीनचे वाटप

**पनवेल :** अंदाड गावात तसेच पनवेल-तक्का आदिवासी ग्रामीण विभागात हर्षला तांबोळी आणि नारायण लक्ष्मण तांबोळी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल अंतर्गत सॅनिटरी नॅपकीनची जनजागृती करण्यासाठी जिल्हा परिषद शाळा अंदाड या ठिकाणी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिलांना सॅनिटरी नॅपकीनविषयी जनजागृती करून त्याचे वाटप करण्यात आले. मासिक पाळीच्या दिवसांमध्ये पॅड्स वापरणे कधीही उत्तम असते. पॅड्स वापरायला सोपे आणि सुरक्षित असतात. कापड त्वचेसाठी चांगले असले तरी नोकरी करणाऱ्यांसाठी किंवा शाळा-कॉलेजच्या निमित्ताने दिवसभर बाहेर राहणाऱ्यांसाठी सॅनिटरी नॅपकीन, टॅम्पोन्स, कप्स या गोष्टी सोयीस्कर ठरतात. अशाप्रकारचे मार्गदर्शन या वेळी करण्यात आले. या वेळी विजया चौधरी, विशाखा कापडी, गौरी जगे, तन्वी तांबोळी, सुमन आणि संजय बोराडे हे उपस्थित होते.

### बेपत्ता तरुणींना शोधण्यात यश

**पनवेल :** वलप गाव परिसरातून तीन तरुणी ज्यामध्ये दोन अल्पवयीन व एक सज्ञान या राहत्या घरात कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्या होत्या. याबाबतची तक्रार त्यांच्या पालकांनी पनवेल तालुका पोलिसांना करताच तांत्रिक तपासाच्या आधारे या तीनही मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी दोन मुलींना बदलापूर येथून व एका अल्पवयीन मुलीस ठाणे येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी करता त्या तिघी जणी आपले वेगळे आयुष्य व आई-वडिलांचे कोणतेही बंधन नसावे याकरिता परस्पर घरातून निघून गेल्याचे त्यांनी मान्य केले. तिन्ही मुलींना पोलिसांनी त्यांच्या पालकांच्या ताब्यात सुखरूपपणे सुपूर्द केले.

### श्री साईनाथ मंदिराचा वर्धापन दिन

**उरण :** तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील केगाव-दांडा, उरण येथील श्री साईनाथ मंदिराचा बारावा वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि. ४) साजरा होणार आहे.



काकड आरती, महाभिषेक व मंगल स्नान, होमहवन, श्री सत्यनारायण पूजा, मध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद, दुपारी पालखी मिरवणूक, नगर प्रदक्षिणा, रात्री साई भंडारा व महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी साईभक्त मुख्य विश्वस्त दामोदर दंडाश्री रेड्डी, हिराबाई रेड्डी, लहू रेड्डी, मेघा रेड्डी, अमित रेड्डी, अंजली रेड्डी, विकास गायकवाड, महेंद्र म्हात्रे, वासुदेव ठाकूर, सचिन केणी, सौरभ म्हात्रे, तेजस म्हात्रे आदींचे सहकार्य मिळणार आहे. त्याच प्रमाणे केगाव-दांडा ग्रामस्थ मंडळ, ओम साई भक्त मंडळ केगाव-दांडा, निकिता डेकोरेटरस, येशिदेव बॅन्जो पथक केगाव-दांडा आदी व्यवस्थापक म्हणून काम पाहणार आहेत.

# लग्नाच्या मुहूर्तावर 'अवकाळी'ची हजेरी

## ■ वऱ्हाडी मंडळींसह करवल्यांचा हिरमोड



**नवी मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुळशीविवाह झाल्यानंतर लगीनसराई सुरू झाली असून मंगळवार, बुधवार अनेक मुहूर्त होते. पनवेल, नवी मुंबईत आगरी-कोळी समाज मोठ्या प्रमाणात असल्याने घराजवळील मोकळ्या जागेत लग्न सोहळे करण्याचे प्रमाण जास्त आहे. अवकाळी पावसाने या लग्नांसाठी टाकण्यात आलेल्या मंडपांचे नुकसान झाले. बंद सभागृहात असलेल्या लग्न सोहळ्यांनाही या अवकाळी पावसाचा फटका बसला आहे.

लग्नानंतर निघणाऱ्या मिरवणुका पावसामुळे रद्द कराव्या लागलेल्या. पाऊस आणखी दोन ते तीन दिवस कोसळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला असल्याने लगीन घरातील मंडळींचा हिरमोड झाला आहे. दिवाळीची चाहूल लागताच तुळशी विवाहानंतर चांगला मुहूर्त पाहून लग्नसराईला सुरुवात झाली आहे. या लगीनघाईच्या गडबडीत अवकाळी पावसाने बुधवारी पहाटेपासूनच हजेरी लावल्यामुळे वधू-वरांच्या नातेवाइकांसह हजारो रुपयांच्या साजशृंगारात नटूनथटून आलेल्या करवाल्यांचा मात्र अचानकपणे सुरू झालेल्या पावसामुळे हिरमोड झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.


(प्रातिनिधीक छायाचित्र)

आगरी कोळी समाजासह इतर समाजातील विवाह सोहळे धुमधडाक्यात साजरे केले जातात, मात्र बुधवारी पहाटेपासूनच वरुणराजाने अचानक हजेरी लावल्याने याचा आर्थिकदृष्ट्या आणि त्रासदायक परिणाम वधूवरांच्या लग्नसोहळ्यावर झाला. त्यामुळे साखरपुडा आणि हळदी, लग्न सोहळ्यात साजशृंगार (मेकअप), तसेच लाखो रुपयांची अंगावर आभूषणे असणाऱ्या वधू-वरांच्या वरमाई आणि करवल्यांचा हिरमोड झाला. इतकेच नव्हे तर साखरपुडा आणि विवाह सोहळ्यासाठी लाखो रुपये खर्चून भव्य मैदानात असलेले स्टेज भिजल्याने वधू-वरांसह भटजींपासून ते शेकडो वऱ्हाडी मंडळींवर डोक्यावर छत्री घेऊन उभे राहण्याची वेळ आल्याचे चित्र बुधवारी पाहावयास मिळाले.

### मंडप डेकोरेटर्सचे नुकसान

***बँड पथकांतील वाद्य साहित्याला पाण्याचा स्पर्श होऊ नये म्हणून अक्षरश: प्लास्टिक पिशव्या गुंडाळून वाद्ये वाजविण्याची पाळी आल्याने तारांबळ उडाली होती. लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्टेजचे साहित्य, मखमली कारपेट, विद्युत रोषणाई आदी साहित्य भिजल्याने मंडप डेकोरेटर्सचे मोठे आर्थिक नुकसान झाले.***

## नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या प्रयत्नाने कोविड लसीकरण केंद्राला जागा उपलब्ध

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नगरसेवक विजय चिपळेकर यांनी पुढाकार घेत गुरुवारी (दि. २) कामोठे गावातील हनुमान मंदिरात लसीकरण केंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.

कोरोना विरुद्ध लढण्यासाठी लसीकरण हेच एकमेव हत्यार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच आपल्या देशाने १०० कोटी लसीकरणाचा टप्पा पार केला आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचे लसीकरण होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर कामोठे गावातील रहिवाशांच्या सोयीसाठी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले होते. या केंद्रावर प्रत्येक गुरुवारी लस उपलब्ध होत होती, मात्र १ डिसेंबरपासून राज्यातील शाळा पुन्हा सुरू करण्यात आल्यामुळे लसीकरण केंद्रासाठी जागेची अडचण निर्माण झाली होती. प्रत्येक नागरिकाचे लसीकरण होण्याच्या दृष्टीने लसीकरण केंद्रास तत्काळ जागा मिळणे आवश्यक होते. यासाठी नगरसेवक विजय चिपळेकर यांनी ग्रामस्थांशी चर्चा व विनिमय करून प्रत्येक गुरुवारी कामोठे गावातील हनुमान मंदिरात लसीकरण केंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिली.



या कामात पुरातन श्री गणेश मंदिराचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांचे सहकार्य लाभले. दिलीप म्हात्रे यांना हनुमान मंदिरातील लसीकरण केंद्रात पहिली लस घेण्याचा मान मिळाला. लसीकरण केंद्राची जागेची अडचण दूर होऊन पुन्हा पूर्ववत लसीकरण केंद्र सुरू झाल्यामुळे आरोग्य कर्मचारी आणि रहिवाशांनी समाधान व्यक्त केले.

## बोटीतून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी

### सागरी सुरक्षा कवच अभियान

**उरण : वार्ताहर**

किनारपट्टीवरील सागरी सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजित मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सागरी सुरक्षा कवच अभियान राबविण्यात आले. यामध्ये बोटीतून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी करण्यात आली. बुधवारी (दि. १) सकाळी ६ वाजल्यापासून गुरुवारी (दि. २) सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे अभियान राबविण्यात आले.



या अभियानांतर्गत ठिकठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यात घारापुरी येथील राज बंदर जेट्टी येथे एक अधिकारी व सहा कर्मचारी, सेतबंदर जेट्टी येथे एक अधिकरी व पाच कर्मचारी, केगाव लॅन्डिंग पॉइंट येथे एक अधिकारी व चार कर्मचारी, मरीन सोलुशन येथे दोन कर्मचारी, नवीन मरीन येथे दोन कर्मचारी, हनुमान कोळीवाडा येथे आठ कर्मचारी, मोरा ऑपरेशन दोन कर्मचारी असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मोरा जेट्टी येथे मुंबई (भाऊचा धक्का) येथून येणाऱ्या बोटीतून येणाऱ्या प्रवाशांचे समान सामग्री, तपासून त्यांच्याविषयी चौकशी करण्यात आली. प्रवाशांचे ओळखपत्र व इतर माहिती घेण्यात आली. या ठिकाणी दोन अधिकारी, महिला पोलीस, कर्मचारी आदी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

कुठलीही संशयित व्यक्ती किंवा वस्तू अथवा बोट आढळल्यास याबद्दलची माहिती मोरा सागरी पोलीस ठाण्यास देण्यात यावी, असे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजित मोहिते यांनी केले आहे.

## मोहोपाडा येथे 'अंनिस'चा कार्यक्रम उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) मोहोपाडा रसायनी या शाखेचा पहिला जाहीर कार्यक्रम मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात झाला.

संविधान दिन व महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून 'जोतिबांचे कार्य व संविधानिक मूल्ये' यावर वृषाली मगदूम (स्त्री मुक्ती संघटना) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. याच वेळी पनवेल शाखेच्या वतीने 'सापडलं रे सापडलं' हे संविधानावरचे रिंगण नाट्यही सादर करण्यात आले.

रसायनी शाखेचा हा पहिलाच कार्यक्रम उत्साह वाढवणारा ठरला. शाखेचे कार्यकर्ते रोहिदास कवळे, प्राजक्ता कवळे, प्राची शेळके, राजन ताटे, आरती नाईक, महेंद्र, संदेश यांनी सर्व नियोजन केले होते.




## कोपर येथील शाळेत प्रवेशोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर येथील प्राथमिक शाळेचा प्रवेशोत्सव शासकीय आदेशानुसार करण्यात आला. कोरोनामुळे देशातील सर्व शाळा बंद होत्या, परंतु बुधवार (दि. १) पासून राज्य सरकारच्या आदेशानुसार शाळा सुरू करण्यात आल्या. त्यानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर (गव्हाण) येथील प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव बुधवारी करण्यात आला.

या प्रवेशोत्सवासाठी शाळेचे चेअरमन अनंताशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत उपस्थित होते.



मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. यासोबत मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते.

## तळोजा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी जितेंद्र सोनवणे

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी जितेंद्र सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी पदभार स्वीकारल्यावर अनेकांनी भेटून शुभेच्छा दिल्या. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांची बदली नियंत्रण कक्ष येथे झाली असून त्यांच्या जागेवर जितेंद्र सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी पदभार स्वीकारला. या वेळी पोलीस खात्यातील त्यांचे सहकारी मित्र, कर्मचारी व अनेकांनी शुभेच्छा दिल्या.



## नेरूळ विद्याभवनमध्ये नियमित योगासन वर्ग

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलामध्ये पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक आणि मुख्य योगशिक्षक दिनेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाने गेल्या दोन महिन्यांपासून नियमित योग वर्ग घेतले जात आहेत.

कोरोनामुळे कुमारवयीन विद्यार्थ्यांवर शारीरिक आणि मानसिक परिणाम झालेले जाणवत आहेत. योगासन करणे हा शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य रक्षणाचा मार्ग प्राचीन भारतीयांनी दाखवला आहे. योगासने, प्राणायाम आणि ध्यान अनेक शारीरिक व्याधींना दूर करून आपल्याला मानसिक संतुलन व्यवस्थित ठेवण्यास मदत करतात, असे मत दिनेश मिसाळ यांनी व्यक्त केले.

सूर्यनमस्कार, धनुरासन, शलभासन, चक्रासन, पद्मासन, वज्रासन, ताडासन, ध्यान, प्राणायाम, कपालभाती आणि इतर योगासने विद्यार्थी आणि शिक्षकांना शिकवली जातात आणि नियमित व्यायाम करून घेतला जातो. कोरोनाचे सर्व नियम पाळून या योगासन वर्गाचा बहुतांश विद्यार्थी, शिक्षक आणि मुख्याध्यापक नियमित लाभ घेत आहेत. या उपक्रमाचे पालकांनी स्वागत केले आहे.



## जागतिक एड्स दिनानिमित्त आजिवलीत आरोग्य प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या राष्ट्रीय जनस्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, मुंबईच्या वतीने बुधवारी (दि. १) आजिवलीतील प्राथमिक आरोग्य केंद्रात जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने असमानता संपवूया, एड्सला संपवूया या विषयावर आरोग्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे संचालक डॉ. सुनील गीते यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे सहसंचालक डॉ. सुधीर वंजे, वैद्यकीय अधिकारी डॉ. कृष्णजा, प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रभारी डॉ. तांदळे आणि साई संजीवनी रुग्णालयाच्या डॉ. सोनल राऊत आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. सुनील गीते यांनी उपस्थित आशा कार्यकर्ता आणि नागरिकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, समाजात असलेल्या असमानतेने अनेकदा एचआयव्ही बाधित असलेले आणि ज्यांना या आजाराचा धोका आहे, असे नागरिक तपासणी आणि उपचारासाठी पुढे येत नाहीत. तेव्हा सगळ्यांनी सामुदायिक प्रयत्न करून अशा तपासणी आणि उपचार यापासून वंचित राहणाऱ्या लोकांना पाठबळ देण्याची आणि त्यांच्या मनात विश्वास निर्माण करण्याची गरज आहे. त्यांनी या प्रसंगी आशा दिनानिमित्ताने सर्व आशांना शुभेच्छाही दिल्या.

संस्थेचे सहसंचालक डॉ. सुधीर वंजे यांनीदेखील आपले विचार व्यक्त केले. त्यांनी आशा सेविका ह्या आरोग्य सेवा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात, त्यांचे ग्रामीण भागात सेवा देण्यात योगदान मोठे असल्याचे नमूद केले. आयोजित प्रदर्शनासाठी संस्थेच्या मास्टर्स ऑफ पब्लिक हेल्थ या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. त्यात समाजातील असमानता दूर करण्यासाठी आपण कसे प्रयत्न करायला हवे याची माहिती प्रदर्शित करण्यात आली होती.

या आरोग्य प्रदर्शनाचा ४५ आशा सेविका आणि सुमारे २०० नागरिकांनी लाभ घेतला. आयोजनासाठी संस्थेच्या जन स्वास्थ्य परिचर्या अधिकारी आशा खंडागळे, तेजस्विनी मेश्राम, गणेश चव्हाण, आरोग्य सहाय्यक संदेश गोवारी, सामाजिक कार्यकर्ता संजय भोंगे, संजना सोनावळे, श्रीनिवास मेहेत्रे यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

# वर्दीचे वाईट दिवस

**ब्रिटनच्या स्कॉटलंड यार्ड या पोलीस दलाच्या खालोखाल प्रतिष्ठा असलेल्या मुंबई पोलिसांची उजळ प्रतिमा आता मात्र काळवंडू लागली आहे. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यावर अखेर गुरुवारी निलंबनाची कुऱ्हाड कोसळली. हे अपेक्षितच होते. किंबहुना, खंडणीखोरी, बेशिस्त वर्तन, कामकाजातील अनियमितता आदी कारणांमुळे परमबीर सिंह यांच्यावर निलंबनाची जी कारवाई करण्यात आली, ती आधी का झाली नाही हा खरा प्रश्न आहे.**

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह हे एकेकाळी सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारचे अतिशय लाडके होते हे जनता अजून विसरलेली नाही. टीव्ही अँकर अर्णब गोस्वामी टीआरपी घोटाळा, कंगना राणावतवरील कारवाईचे प्रकरण आणि अभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या मृत्यूची केस या सर्व प्रकरणांच्या काळामध्ये परमबीर सिंह महाविकास आघाडी सरकारचे कमालीचे लाडके झाले होते, परंतु अचानक तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या विरोधात परमबीर यांनी आरोपांचा सपाटा लावल्यानंतर ते सरकारच्या गुड बुक्समधून बॅड बुक्समध्ये गेले. गृहमंत्र्यांवर अनेक आरोपांची सरबत्ती करणारे पत्र परमबीर यांनी थेट मुख्यमंत्र्यांना धाडून दिले. त्यानंतर खुद्द गृहमंत्र्यांनाच गजाआड व्हावे लागले. मधल्या काळामध्ये परमबीर सिंह तब्बल २३४ दिवस बेपत्ता होते. न्यायालयाकडून संभाव्य अटकेबाबत अभय मिळाल्यानंतरच ते प्रकट झाले. बेपत्ता आयुक्ताचे निलंबन तेव्हा का झाले नाही, असा प्रश्न आता आघाडी सरकारला विचारला जात आहे, परंतु त्याचे उत्तर कधीच मिळणार नाही. मुंबई पोलिसांसाठी हा सारा घटनाक्रम दुर्दैवी म्हटला पाहिजे. मुंबई पोलिसांच्या खाकी वर्दीला इतके वाईट दिवस क्वचितच बघावे लागले असतील. गुन्हेगारांचा कर्दनकाळ म्हणून मुंबई पोलिसांचा लौकिक होता. आजही बहुसंख्य पोलीस बांधव मुंबईसारख्या महानगरातील गुन्हेगारी विश्वावर नियंत्रण ठेवण्यात व्यग्र असतात. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त आणि ज्येष्ठ निवृत्त पोलीस अधिकारी ज्युलिओ रिबेरो यांची कारकीर्द एकेकाळी गाजली होती. स्वच्छ प्रतिमेचे आणि सडेतोड स्वभावाचे रिबेरो गुन्हेगारांवर वचक ठेवून होतेच, परंतु आपल्या राजकीय वरिष्ठांना देखील त्यांनी दोन हात दूर ठेवले. याच रिबेरो यांनी एका खाजगी टीव्ही वाहिनीला मुलाखत देताना मुंबई पोलिसांच्या सद्यस्थितीवर खरमरीत टीका केली. सचिन वाझेसारखे पोलीस अधिकारी खाकी वर्दीतील गुंडच समजले पाहिजेत तसेच अंतुले, भुजबळ आणि अनिल देशमुख यांच्या कारकिर्दीमध्ये मुंबई पोलिसांचा लौकिक धुळीला मिळाला अशी परखड मते त्यांनी नोंदवली. रिबेरो यांनी व्यक्त केलेली मते ही जणू मुंबईकर आणि महाराष्ट्रातील जनतेच्याच भावना आहेत हे राज्यातील सत्ताधाऱ्यांनी समजून घ्यावे. काही आंबे सडके निघाले म्हणून सगळी अढी नासलेली नसते. एखाद-दोन सडक्या आंब्यांमुळे आंबा हे फळच वाईट असे मानण्याचेही कारण नसते. त्याचप्रमाणे सचिन वाझेसारखे अधिकारी हे संपूर्ण पोलीस दलाला बदनाम करू शकत नाहीत. सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या याच मुंबई पोलीस दलामध्येच शहीद तुकाराम ओंबळेसारखे नायक निर्माण झाले याचा विसर आपल्याला पडायला नको. परमबीर सिंह यांचे निलंबन ही एक अपरिहार्य बाब होती. बेशिस्त कारभारापासून अ‍ॅट्रॉसिटीपर्यंत अनेक आरोपांबाबत परमबीर यांच्यावर विविध ठिकाणी खटले दाखल झाले आहेत. त्याचा यथावकाश निकाल लागेलच. दरम्यान, वर्दीवरील हे कलंक दूर करण्यासाठी पोलीस दलाने निःस्पृहपणे झटले पाहिजे.

# मतदार नोंदणी करूया... मताधिकार बजावूया!

लोकशाही व्यवस्थेत मतदानाला अत्यंत महत्त्व आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराने आपला मताधिकार वापरणे गरजेचे आहे. या हक्काचा वापर करण्यासाठी सर्वप्रथम मतदार यादीत नावनोंदणी करणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही अधिक बळकट होण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा जास्तीत जास्त सहभाग वाढावा, या उद्देशाने दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात भारत निवडणूक आयोग मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर करते. या कार्यक्रमांतर्गत मतदार यादीत नाव नोंदणी, तपशिलात दुरुस्ती, पत्त्यांमध्ये बदल, मृत मतदारांची नावे वगळणे, विधानसभा मतदार संघांतर्गत पत्ता बदलला असल्यास नावाचे स्थानांतरण इत्यादी कामे या पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत केली जातात.

मतदार यादीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. ३० नोव्हेंबर २०२१पर्यंत मतदार नोंदणी सुरू राहणार आहे. पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीत नाव समावेश होणाऱ्या मतदारांनाच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

**प्रश्न : भारत निवडणूक आयोगाच्या वतीने दि. १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. हा कार्यक्रम नेमका काय आहे आणि कधीपर्यंत राबविण्यात येणार आहे?**

उत्तर : या कार्यक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मतदार अर्हता दिनांक बदलणे हे आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमात अर्हता दिनांक १ जानेवारी २०२२ असेल. या दिवशी जे नागरिक १८ किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे होतील, त्यांना मतदार म्हणून नोंदणी करता येईल. दि. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत मतदारांना दावे आणि हरकतीसाठी आवाहन केले जाते. त्यानंतर दि. १ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२१ पर्यंत हे दावे आणि हरकती निकालात काढले जातात. त्यासाठी बीएलओ त्या-त्या पत्त्यावर जाऊन पडताळणी, पाहणी करतात, कागदपत्र तपासली जातात. त्याचे अहवाल मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केले जातात. मग मतदार नोंदणी अधिकारी ते नाव ठेवायचे की काढायचे याचा निर्णय घेतात. हे सगळे झाल्यानंतर सुधारित अंतिम यादी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात प्रकाशित केली जाते.

**प्रश्न : कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील अधिकाधिक मतदारांची नोंदणी होण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने कोणकोणते उपक्रम राबविण्यात येत आहेत?**

उत्तर : महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या आवाहनासह जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांना, स्वयंसेवी संस्थांना, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या आवाहनाच्या चित्रफिती प्रसारित करण्यात आल्या आहेत. वय वर्षे १८ पूर्ण झालेल्या व दि. १ जानेवारी २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची १०० टक्के मतदार नोंदणी करून घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. याशिवाय जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयात मतदार जागृती मंच मतदार साक्षरता मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळावर त्या त्या कॉलेजच्या राज्यशास्त्र विभाग किंवा राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्राध्यापकांना समन्वय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. याद्वारे कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणीवर विशेष भर दिला जात आहे, तसेच जिल्ह्यात सर्व गावांमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन मतदार याद्यांचे जाहीर वाचन करण्यात आले.

**प्रश्न : तृतीयपंथी, देहविक्री करणाऱ्या महिला आणि दिव्यांगांना मतदार नोंदणी करता येण्यासाठी प्रशासनाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या उपक्रमांबाबत काय माहिती द्याल?**

उत्तर : तृतीयपंथी, देहविक्री करणाऱ्या महिला आणि दिव्यांगाना मतदार नोंदणी करता येण्यासाठी प्रत्येक तालुक्यात दि. २७ व २८ नोव्हेंबर २०२१ या दोन्ही दिवशी विशेष मतदार नोंदणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरांतर्गत वंचित घटकांच्या नावनोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले गेले. दि. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत या घटकांना नोंदणी करता येईल.

**मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी घेतलेली मुलाखत...**

**प्रश्न : मतदार नावनोंदणी करण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

उत्तर : मतदार म्हणून नाव नोंदणी करू इच्छिणाऱ्या नागरिकाने अर्ज क्रमांक ६ भरणे आवश्यक आहे. या अर्जानुसार संबंधित नागरिकाने पुढील पाच गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे: १) अर्जदार भारताचा नागरिक असावा २) स्वतःचे छायाचित्र, ३) इतर कोणत्याही मतदार यादीत नाव नाही याविषयीचे प्रतिज्ञापत्र, जे अर्ज क्रमांक ६ मध्येच अंतर्भूत असते, ४) वयाचा दाखला, ५) निवासाचा पुरावा.

**प्रश्न : मतदार नोंदणी करताना वयाच्या पुराव्यासाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते?**

उत्तर : मतदार यादीत नाव नोंदणी करताना वयाचा पुरावा म्हणून पुढीलपैकी कोणत्याही एका दस्तावेजाची आवश्यकता असते : १) जन्म दाखला, २) शाळा सोडल्याचा दाखला, ३) जन्मतारखेची नोंद असलेली पाचवी/आठवी/दहावी/बारावी यापैकी एका इयत्तेची गुणपत्रिका, ४) पॅन कार्ड, ५) वाहन चालक परवाना, ६) भारतीय पासपोर्ट, ७) आधार कार्ड. यापैकी कोणतेही एक कागदपत्र आवश्यक आहे.

**प्रश्न : १८ ते २१ दरम्यान वय असणाऱ्या व्यक्तीकडे वयाच्या पुराव्यासाठी कोणतेही दस्तावेज नसतील तर कशी नोंदणी करता येईल?**

उत्तर : १८ ते २१ या दरम्यान वय असेल आणि त्या व्यक्तीकडे वयाचे वरीलपैकी कोणतेही दस्तावेज नसतील, तर त्या व्यक्तीच्या पालकाने त्या व्यक्तीचे वय अमुक आहे, असे लेखी प्रतिज्ञापत्र दिले तर ते ग्राह्य धरले जाते.

**प्रश्न : रहिवासी पुराव्यासाठी कोणते दस्तावेज आवश्यक आहेत?**

उत्तर : निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आवश्यक दस्तावेज–

१) बँक/किसान/टपाल यांचे चालू खातेपुस्तक म्हणजे पासबुक, २) शिधावाटप पत्रिका म्हणजेच रेशनकार्ड, ३) भारतीय पासपोर्ट. ४) वाहनचालक परवाना, ५) अलीकडील भाडेकरार, ६) पाणी/टेलिफोन/वीज/गॅस यांचे अलीकडचे देयक म्हणजेच बिल (हे देयक तुमच्या स्वतःच्या नावे नसेल, तर तुमच्या जवळच्या नात्यातल्या व्यक्ती –आई/वडील/पती/पत्नी– यांच्या नावे असले तरी चालू शकते. तृतीय पंथीयांच्या बाबतीत ही बिले गुरूच्या नावे असतील तरी चालू शकते.), ७) प्राप्तिकर निर्देश पत्रिका म्हणजेच इन्कमटॅक्स असेसमेंट ऑर्डर, ८) भारतीय टपाल विभागाद्वारे अर्जदाराच्या सध्याच्या निवासस्थानाच्या पत्त्यावर प्राप्त झालेलं कोणतंही टपालपत्र. यापैकी कोणताही एक दस्तावेज आवश्यक आहे.

**प्रश्न : नाव नोंदणीनंतर पत्ता बदलला असल्यास काय करावं लागेल?**

उत्तर : कायमस्वरूपी कुठेही वास्तव्य नसलेल्या व्यक्तींचे निवास सतत बदलण्याची शक्यता असते. जर अशा व्यक्तीचा नवा पत्ता आधीच्याच मतदारसंघातला असेल, तर तिला अर्ज क्र. ८ अ भरून नव्या पत्त्याची नोंद करावी लागेल, पण जर ती व्यक्ती अन्य मतदारसंघात वास्तव्यास गेली असेल, तर तिला आधीच्या मतदारसंघातील नाव वगळावं लागेल. ते वगळण्यासाठी तिला अर्ज क्रमांक ७ भरावा लागेल आणि मग नव्या मतदारसंघात नाव नोंदणी करण्यासाठी अर्ज क्रमांक ६ भरावा लागेल.

**प्रश्न : नाव, लिंग किंवा इतर तपशिलांच्या दुरुस्तींसाठी काय करावं लागतं?**

उत्तर : बरेचदा तृतीय पंथीयांनी आधी स्त्री किंवा पुरुष म्हणून नोंदणी केलेली असते आणि अशी नोंदणी करताना त्यांची आधीची नावे मतदार यादीत नोंदवलेली असतात. अशा वेळी त्यांना अर्ज क्रमांक ८ भरून त्यांचं नाव आणि लिंग यामध्ये दुरुस्ती करता येईल. **(क्रमशः)**

# नागरिकांनी सतर्क राहावे

## ‘ओमायक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर मुरुड तहसीलदारांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

ओमायक्रॉन व्हेरिएंट आढळल्यामुळे करोनाची नवीन लाट येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुरूडमधील नागरिकांनी सतर्क राहून सहकार्य करावे, आवाहन तहसीलदार गोविंद वाकडे यांनी येथे केले.



(छाया : संजय करडे)

ओमायक्रॉन व्हेरिएंटच्या पार्श्वभूमीवर मुरूड तहसीलदार गोविंद वाकडे यांनी महसूल विभाग, नगर परिषद, पंचायत समिती, मेरिटाईम बोर्ड, हॉटेल-चालक-मालक व पर्यटनस्थळ भागातील सर्व सरपंच यांच्या सभेचे आयोजन तहसीलदार कार्यालय करण्यात आले होते. त्या वेळी गोविंद वाकडे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. ओमायक्रॉन व्हेरिएंटचा संसर्ग वाढता कामा नये, यासाठी आपण आतापासूनच काळजी घेणे जरूरी आहे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

मुरूड तालुका पर्यटनस्थळ असून या ठिकाणी हाजारो पर्यटक ये-जा करीत असतात. त्यामुळे आपल्याला जागृत राहणे आवश्यक आहे. त्यासाठी हॉटेल, लॉजिंग मालकांनी व चालकांनी अधिक सतर्क राहावे. नियमाचे पालन न झाल्यास पर्यटकांसह त्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार वाकडे यांनी दिला.

नायब तहसीलदार रवींद्र सानप, गोविंद कोटंबे, पोलीस उपनिरीक्षक रेखा जगदाळे, गटविकास अधिकारी सुभाष वाणी, बंदर निरीक्षक यशोधन कुलकर्णी, आरोग्य अधिकारी संजय दुबे, वैद्यकीय अधिकारी विद्या सोनम, नगर परिषद आरोग्य अधिकारी राकेश पाटील, सरपंच हिरकणी गिदी, रामकृष्ण आगरकर, अशोक पाटील, कुणाल सतविडकर, मंडळ अधिकारी संजय नवर, अरविंद देशमुख, ग्रामसेवक अविनाश पिंपळकर, ऋचित बैले आदी या सभेला उपस्थित होते.

# परीट समाजाला सवलती परत मिळाव्यात -बोरसे

**धाटाव : प्रतिनिधी**

परीट समाजाचा पूर्वी अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्यात आला होता, मात्र त्या सवलती काढून घेण्यात आल्या. तेव्हापासून परीट समाजाचा लढा सुरू आहे. पूर्वी असलेल्या अनुसूचित जातीच्या सवलती परीट समाजाला परत मिळाव्यात, असे प्रतिपादन परीट सेवा मंडळाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष एकनाथराव बोरसे यांनी माणगाव येथे केली.


(छाया : जितेंद्र जाधव)

परीट सेवा मंडळच्या रायगड जिल्हा कमिटीचा सन्मान सोहळा रविवारी रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यात एकनाथराव बोरसे मार्गदर्शन करीत होते.

राज्यातील ३६ जिल्ह्यांत परीट समाजाचा विस्तार आहे. देशात सुमारे साडेआठ कोटी परीट समाज बांधव आहेत. १८ राज्यात आमचा समाज अनुसूचित जमातीत समाविष्ट आहे. महाराष्ट्रातील भंडारा आणि बुलडाणा जिल्ह्यात १९६० पूर्वी परीट समाज अनुसूचित जातीत होता. त्यामुळे राज्यातील परीट समाजाला सवलती मिळणे आवश्यक आहे, असे बोरसे यांनी या वेळी सांगितले.

> **परीट सेवा मंडळाची रायगड जिल्हा कमिटी नव्याने स्थापन करण्यात आली आहे. समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. आता समाजाला आरक्षणाची प्रतीक्षा आहे.**
> **-शांताराम घाग, उपाध्यक्ष, महाराष्ट्र परीट सेवा मंडळ**

परीट सेवा मंडळाचे राज्य उपाध्यक्ष शांताराम कदम, प्रकाश पवार, दीपक कदम, अनिल सुर्वे, किशोर वासकर, रवींद्र कान्हेकर, भारती जाधव, दिलीप सुर्वे, सुनिल सुर्वे, अशोक गायकर, मनोहर राऊत, नथुराम येलकर, बाबूराव कान्हेकर, चंद्रकांत घाग, प्रशांत कदम, विलास तळेकर, दीपक देवधरकर, संजय अंबावले, गजानन सवतिरकर आदी पदाधिकाऱ्यांसह समाज बांधव या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत, रोहा तालुक्यातील शाळा सुरू


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि खाजगी माध्यमिक शाळा बुधवार (दि. १) पासून पुन्हा एकदा गजबजल्या. अनेक महिन्यांच्या कालावधीनंतर विद्यार्थी मोठ्या संख्येने आपापल्या शाळांमध्ये पोहचले आणि त्यांनी शाळेच्या प्रांगणात मुक्त संचार केला.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली दीड वर्षे शाळा बंद होत्या. त्या १ डिसेंबरपासून सुरू करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले होते. कर्जत तालुक्यात ७८ अनुदानित आणि खाजगी माध्यमिक शाळा असून या शाळांमधील इयत्ता आठवी ते दहावीचे वर्ग पूर्वीच सुरू झाले होते. आता बुधवारपासून तेथे पहिली ते दहावीपर्यंतचे सर्व वर्ग सुरू झाले आहेत, अशी माहिती तालुका शिक्षण अधिकारी सुरेखा हिरवे यांनी दिली.

## रोह्यात वरुणराजाने केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील प्राथमिक शाळा बुधवार (दि. १) पासून सुरू झाल्या. पहिल्या दिवशी ग्रामीण भागातील ३०५८ पैकी १८३४ तर शहरी भागातील ३५४ पैकी २१२ विद्यार्थ्यांनी शाळेत हजेरी लावली. त्या सर्वांचे वरुणराजाने स्वागत केले.

कोरोना नियमाचे पालन करून तब्बल दीड वर्षानंतर रोहा तालुक्यात शाळेची घंटा वाजल्याने विद्यार्थ्यांसह पालकांनी समाधान व्यक्त केले. रोहा तालुक्याच्या ग्रामीण भागात १७१ तर शहरी भागात दोन प्राथमिक शाळा आहेत. त्या सर्व शाळा सुरू झाल्या आहेत. ग्रामीण भागातील ३३६ पैकी ३३५ आणि शहरी १० पैकी १० शिक्षकांनी उपस्थिती लावली.


(छाया : महादेव सरसंबे)

## मुरूड तालुक्यातील आठ ग्रा.पं.मध्ये पोटनिवडणूक

*सदस्यपदाच्या २१ जागांसाठी २१ डिसेंबरला मतदान*

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील आठ ग्रामपंचायतींमधील सदस्यपदांच्या २१ रिक्त जागांसाठी २१ डिसेंबरला पोटनिवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती मुरूडचे तहसीलदार गोविंद वाकडे यांनी दिली.

मुरूड तालुक्यातील सावली, उसरोली, चोरढे व कोर्लई ग्रामपंचायतींमधील प्रत्येकी एक, वावडुंगी व मजगाव ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येकी दोन, राजपुरी ग्रामपंचायतीमधील चार आणि एकदरा ग्रामपंचायतीमधील नऊ अशा सदस्यपदाच्या एकूण २१ जागा रिक्त आहेत. त्यासाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार ६ डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. अर्जांची छाननी ७ डिसेंबरला, माघार ९ डिसेंबरपर्यंत व याच दिवशी चिन्ह वाटप होईल. २१ डिसेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान व २२ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.

# माणगावात कालवा सफाईस सुरुवात

## १५ डिसेंबरपासून पाणी सोडले जाणार

**माणगाव : प्रतिनिधी**

काळ प्रकल्पांतर्ग डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगाव तालुक्यातील शेतीला सोडण्यात येते. या कालव्यांच्या सफाईची कामे पाटबंधारे विभागाने हाती घेतली आहेत. मात्र यंत्रसामुग्री अपुरी असल्याने ही कामे पुर्ण वेळेत पूर्ण होतील का, असा सवाल शेतकऱ्यातून उपस्थित करण्यात येत आहे. येत्या १५ डिसेंबरपासून कालव्यातून पाणी सोडण्यात येणार आहे.

अतिवृष्टीमुळे या कालव्यात मोठ्या प्रमाणात माती, दगड, गाळ साचला आहे. तसेच कालव्याकाठी शेवाळ व झाडे, झुडपे वाढली आहेत. त्याचबरोबर भराव करणे, खांडी भरणे आदी कामेही केली जाणार आहेत. पाटबंधारे विभागाने कालव्याच्या सफाईची कामे नुकतीच हाती घेतली असून कालवा दुरुस्तीचे काम अद्यापही बाकी आहे. या कामाची गाडी धीम्याच गतीने सुरु आहे. कालव्याचे पाणी शेतीला मिळणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



पाटबंधारे विभागाने कालव्यातील गाळ काढण्याचे काम हाती घेतल्यामुळे माणगाव तालुक्यातील शेतकरी रब्बी हंगामाच्या कामाला लागले आहेत. या वर्षी १५ डिसेंबरला कालव्याला पाणी सुटणार असल्याने त्यांची धांदल उडाली आहे.

# राष्ट्रवादीविरोधात शिवसेना, काँग्रेसने ठोकले शड्डू

## ■ भाजपच्या सहकार्याने माणगाव विकास आघाडीचा प्रस्ताव

**माणगाव : सलीम शेख**

येत्या २१ डिसेंबरला माणगाव नगरपंचायतीच्या होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसविरोधात शिवसेना, काँग्रेस आघाडी झाली असून त्यांनी माणगाव विकास आघाडीसोबत येण्याचा प्रस्ताव भाजपसमोर ठेवला आहे. पक्षश्रेष्ठींबरोबर बोलून त्यावर निर्णय घेण्यात येईल, असे भाजपचे तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी सांगितले.



(छाया : सलीम शेख)

माणगाव नगरपंचायतीची पहिली सार्वत्रिक निवडणूक १० जानेवारी २०१६ रोजी झाली होती. त्या वेळी राष्ट्रवादीने एकूण १७ जागांपैकी ११ जागांवर विजय संपादन करून नगरपंचायतीवर एकहाती सत्ता मिळविली होती. त्यानंतर नगरपंचायतीत राष्ट्रवादी व शिवसेनेत फोडाफोडीचे राजकारण झाले. त्यामुळे अडीच वर्षानंतर नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे १३, भाजपचे दोन आणि, शिवसेना व काँग्रेसचे प्रत्येकी एक नगरसेवक असे पक्षीय बलाबल झाले.

माणगाव नगरपंचायतीची दुसरी सार्वत्रिक निवडणूक येत्या २१ डिसेंबरला घेण्याचे जाहीर करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी शेकाप हा राष्ट्रवादीसोबत जाणार असल्याची चर्चा आहे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचा आमच्याकडे कोणताही प्रस्ताव आला नसून या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे शेकापचे माणगाव तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी स्पष्ट केले आहे.

निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याअगोदर आम्ही नगरपंचायत निवडणुकीत उतरणार असल्याचे मनसेने सांगितले होते, मात्र निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर त्यांनी अद्याप त्यांची भूमिका स्पष्ट केलेली नाही.

दरम्यान, राष्ट्रवादीविरोधात शिवसेना, काँग्रेस, भाजप अशी माणगाव विकास आघाडी तयार करण्याविषयी बुधवारी (दि. १) झालेल्या बैठकीत प्राथमिक चर्चा झाली. त्यावर अद्याप शिक्कामोर्तब होणे बाकी आहे. दोन दिवसांत माणगाव विकास आघाडीचे उमेदवार जाहीर होतील, अशी चर्चा माणगावात सुरू आहे.

या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून सर्वच राजकीय पक्ष शक्तिप्रदर्शनाने आपल्या उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र दाखल करणार असल्याचे समजते. एकंदरीत माणगाव नगरपंचायतीची ही सार्वत्रिक निवडणूक अटीतटीची होणार असून मतदारांनी कोणाला कौल दिला हे २२ डिसेंबरला होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होईल.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नातून सोनखार गावातील रस्ते होणार चकाचक


वैकुंठ पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन
(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

सोनखार गावातील अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नातून डोंगरी विकास निधीमधून २० लाखांचा निधी मिळाला आहे. त्यामुळे सोनखार गावातील रस्ते चकाचक होतील, अशी ग्वाही भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी दिली.

सोनखार गावातील अंतर्गत रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन वैकुंठ पाटील यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २) करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. रविशेठ पाटील यांनी या गावाच्या विकासासाठी नेहमीच योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

सोनखार ग्रामपंचायत सदस्य भरत पाटील, विश्वनाथ म्हात्रे, रेश्मा राजेंद्र म्हात्रे, गीता म्हात्रे, हरिश्चंद्र डंगर, कृष्णा ठाकूर आदींसह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



# कर्जतमध्ये संजीवन समाधी सोहळा

**कर्जत : बातमीदार**

येथील अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या वतीने कर्जत शहरातील समितीच्या संत ज्ञानेश्वर महाराज यांचा सप्तशतकोत्तर संजीवन समाधी सोहळा आयोजित करण्यात आला होता. असंख्य वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा झाला.

या निमित्ताने दत्तात्रेय म्हसे, वनिताताई म्हसे या दाम्पत्याने विधिवत महापूजा केली. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी या वेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेतले. मंडळाचे खजिनदार संतोष वैद्य, तसेच सुदाम कार्ले, रामभाऊ वाघमारे, अमोल देशमुख, अनिल पाटील, वासुदेव इंगळे, ज्ञानेश्वर बागडे, छाया पाठक, पुष्पा पाटील, रोहिणी सुर्वे, रत्नप्रभा जोशी, स्वाती देशमुख आदींसह वारकरी या वेळी उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताह सोहळा समितीच्या वतीने या वेळी ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा सत्कार करण्यात आला.

# कर्जत आगारातून पनवेलकरिता एसटी मार्गस्थ

## ■ १९९ पैकी ४३ कर्मचारी रुजू १५६ संपामध्ये सहभागी

**कर्जत : प्रतिनिधी**

एसटी कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारला आहे. गेल्या २४ दिवसांत कर्जत आगारातून एकही एसटी सुटली नव्हती, मात्र गुरुवारी (दि. २) पनवेल फेऱ्यांकरीत एसटी मार्गस्थ झाली. आगारातील १९९ पैकी ४३ कर्मचारी कामावर हजर असून १५६ कामगार अद्यापही संपात सहभागी आहेत.


(छाया : विजय मांडे)

राज्य परिवहन महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण व्हावे आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी २८ ऑक्टोबरपासून आंदोलन सुरू केले आहे. ७ नोव्हेंबरपासून राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केल्याने एकही एसटी आगारातून बाहेर पडली नव्हती. त्यामुळे रामवाडी येथील जिल्हा वाहतूक नियंत्रकांनी १० नोव्हेंबर रोजी कर्जत आगारातील पाच कामगारांचे निलंबन केले होते. त्यानंतर २२ कामगारांना निलंबित करण्यात आले होते, तर २० नोव्हेंबर रोजी आगारातील १४ रोजंदारी कामगारांची सेवा खंडित करण्यात आली होती.

शासनाने कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होण्यासाठी अल्टिमेटम दिल्यानंतर कर्जत आगाराच्या प्रशासन विभागातील काही कर्मचारी रुजू झाले, तर ४६ पैकी केवळ एक वाहक कामावर रुजू झाला. चालक आणि वाहकांनी संपात आपला सहभाग कायम ठेवल्याने कर्जत आगारातून बुधवारपर्यंत एकही एसटी रस्त्यावर आली नव्हती, मात्र गुरुवारी पनवेल फेऱ्यांकरिता एसटी बस मार्गस्थ झाली. चालक श्रावण सोनवणे व वाहक कृष्णा शिंदे यांनी या फेऱ्यांची जबाबदारी स्वीकारली आहे.

# अलिबागेतून एसटी सेवा सुरू; दोन बस झाल्या मार्गस्थ

**अलिबाग : प्रतिनिधी**

एसटीच्या अलिबाग आगारातील दोन कर्मचारी मंगळवारी कामावर हजर झाले. त्यामुळे तब्बल २५ दिवसांनंतर गुरुवारी एसटीच्या दोन बस सोडण्यात आल्या. अलिबाग–मुरूड आणि अलिबाग–पेण या मार्गावर या बसेस धावल्या.

विलिनीकरणाच्या मागणीसाठी गेले २५ दिवस अलिबाग आगारातील एसटी कर्मचारी संपावर होते. त्यामुळे आगारातून एकही बस सुटू शकली नव्हती. परिणामी जिल्ह्याच्या मुख्यालयाला येणाऱ्या प्रवाशांची मोठी कोंडी झाली होती. पगारवाढ झाल्यानंतरही एसटीचे कर्मचारी कामावर रुजू झाले नव्हते. महाड, पेण आणि रोहा तालुक्यातील एसटी कर्मचारी कामावर हजर झाल्याने त्या आगारामधील बस वाहतूक सुरू झाली होती, मात्र अलिबागमधील कर्मचाऱ्यांनी संप सुरूच ठेवला होता.

एसटीचे दोन चालक मंगळवारी कामावर हजर झाले. त्यामुळे अलिबाग आगारातूनही एसटीची सेवा पहिल्यांदाच सुरू झाली. मुरूड आणि पेण मार्गावर विनावाहक बस सोडण्यात आल्या. या दोन्ही बसमधून एकूण १५ प्रवाशांनी प्रवास केला. जळगाव येथे एसटीवर दगडफेकीची घटना घडली होती. ही बाब लक्षात घेऊन अलिबाग येथून बस सोडताना पोलीस आणि सुरक्षा रक्षक तैनात ठेवण्यात आले होते. तर बसचालक सिद्धार्थ गायकवाड यांनी चक्क हेल्मेट परिधान करून बसचे सारथ्य केले.

> **अलिबाग आगारातील दोन चालक हजर झाले. त्यामुळे मुरूड आणि पेण येथे बस सोडण्यात आल्या. उर्वरित कर्मचाऱ्यांनी कामावर हजर व्हावे, असे आवाहन करत आहोत.**
> **–अजय वनारसे, आगार प्रमुख, अलिबाग**

# पशुसंवर्धक, मत्स्य व्यावसायिकांसाठी आज आग्राव येथे विशेष मेळावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

डीएफसी विभाग, भारत सरकार आणि जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशानुसार पशुधन दुग्धव्यवसाय, कुकुटपलान, शेळीपालन त्याचबरोबर मत्स्यव्यवसाय करणाऱ्या शेतकरी बांधवांना किसान क्रेडिट कार्डचा लाभ मिळावा या उद्देशाने पशुसंवर्धन विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग आणि जिल्हा बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती अग्रणी जिल्हा प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी यांनी दिली.

पुढील शिबिर जिल्हा पशुधन विभागामर्फत माणगाव येथील कुणबी समाज सभागृह, निजामपूर रोड येथे शुक्रवारी (दि. ३) सकाळी १०.३० ते दुपारी ३ या वेळेत घेण्यात येणार आहे. त्याचा लाभ माणगाव तालुक्यातील शेतकरी बंधूंनी घ्यावा. त्याचबरोबर जिल्हा मत्स्य विभागामार्फत कोर्लई, रेवदंडा, चौल, आग्राव विभागातील मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांसाठी बापदेव मंदिर, आग्राव येथे शुक्रवारी मेळाव्याचे आयोजन केले आहे.

# अवकाळीने मुरूडमधील शेतकऱ्यांचे नुकसान; वैरणीची कमतरता भासणार

**मुरूड : प्रतिनिधी**

बुधवारी सकाळी सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत पडत राहिल्याने मुरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. भात पिकाबरोबरच पेंढे भिजल्याने गुरांच्या वैरणीचा प्रश्न निर्माण झाला आहे.


(छाया : संजय करडे)

मुरूड तालुक्यातील वावे, वेळास्ते, उसरोली, अदाड, मजगाव, विहूर, आंबोली आदीसह अनेक गावांना अवकाळी पावसाचा तडाखा बसला. भात पीक तयार झाल्यानंतर कापणी करून एका ठिकाणी रचून ठेवला जातो, त्याला मळणी म्हणतात. अवकाळी पावसाने शेतातील मळण्या भिजल्या. त्यामुळे भात पिकांबरोबरच पेंढ्याचेसुद्धा मोठे नुकसान झाले. पेंढ्याचा उपयोग गाय, बैल व म्हैस यांच्या वैरणीसाठी होतो, मात्र अवकाळी पावसामुळे पुढील काळात पेंढ्याचा मोठा तुटवडा भासणार आहे.

आमच्या गावात सुवर्णा जातीच्या भात पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. शेतकऱ्यांनी भात मळण्या रचून ठेवल्या होत्या, मात्र त्यावर पाऊस पडल्याने भात व पेंढ्याचे मोठे नुकसान झाले आहे, असे अदाड गावातील महेश वाडकर व जगनाथ वाडकर या शेतकऱ्यांनी सांगितले.

> **अवकाळीमुळे झालेल्या भात पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदारांनी दिले असून आमच्या विभागाकडून पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.**
> **–व्ही. डी. अहिरे, तालुका कृषी अधिकारी, मुरूड**

# बदलापूर-कर्जत रेल्वे वाहतूक दोन तास विस्कळीत

**कर्जत : बातमीदार**

मालगाडीच्या इंजिनामध्ये बिघाड झाल्यामुळे गुरुवारी (दि. २) दुपारी मध्य रेल्वेच्या बदलापूर ते कर्जत या स्थानकादरम्यानची वाहतूक दोन तास विस्कळीत झाली होती. त्यामुळे लोकलची वाट पाहणारे प्रवासी खोळंबून राहिले होते.

मध्य रेल्वेच्या बदलापूर ते वांगणी स्थानकादरम्यान गुरुवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास मालगाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाला. त्यामुळे कर्जतकडे येणारी रेल्वे वाहतूक खोळंबून राहिली होती. बंद पडलेल्या मालगाडीच्या मागे चेन्नई, काकीनाडा, कोणार्क आणि सिंहगड या चार एक्स्प्रेस गाड्या आणि तीन लोकल गाड्या अडकून पडल्या होत्या.

मालगाडीचे इंजिन दुरुस्त झाल्यानंतर चेन्नई एक्स्प्रेस कर्जत स्थानकात तब्बल पावणेदोन तास उशिरा पोहचली. त्या मागे काकीनाडा एक्स्प्रेस, तीन कर्जत लोकल होत्या. दुपारची वेळ असल्याने कर्जत, नेरळ, वांगणी रेल्वे स्थानकात प्रवाशांची जास्त गर्दी झाली नाही, परंतु पावणेदोन ते दोन तास वाहतूक विस्कळीत झाल्याने प्रवाशांचे हाल झाले.

# मृत्यूंजयदूतांसाठी स्ट्रेचरचे वाटप

## ■ कशेडी टॅप पोलिसांकडून प्रथमोपचाराबाबत प्रशिक्षण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

दक्षता आणि सतर्कता यामुळे अपघातानंतर जखमींचे जीव वाचविण्याचे काम सुकर होते. चुकीच्या प्रकारच्या रेस्क्यूवर्कमुळेदेखील जखमींच्या जीवाशी खेळ होऊ शकतो, असे मत दि रेसिलेन्ट फाऊंडेशनचे प्रशिक्षक भूपेंद्र मिश्रा यांनी व्यक्त केले.

हायवे मृत्यूंजयदूत योजनेंतर्गत कशेडी टॅप पोलिसांनी कशेडी येथील स्वामी समर्थ मठात मृत्यूंजयदूतांसाठी प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. त्यात भूपेंद्र मिश्रा मार्गदर्शन करीत होते. जखमींना रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचविणे, अर्धबेशुद्ध व बेशुद्ध व्यक्तींना शुद्धीवर आणण्यासाठी सीपीआर देण्याची योग्य पद्धती याबाबत मिश्रा यांनी या वेळी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या वेळी भूपेंद्र मिश्रा आणि ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्या हस्ते खेड आणि पोलादपूर येथील मृत्यूंजय देवदूत सदस्यांना स्ट्रेचरचे मोफत वाटप करण्यात आले.

कशेडी टॅप वाहतूक पोलीस उपनिरिक्षक अनिल चांदणे, एएसआय यशवंत बोडकर, मृत्यूंजय देवदूत खेडचे अध्यक्ष प्रसाद गांधी, नूरी ऊर्फ दादा हयातपीर पालोजी, दीपक उतेकर आदींसह वाहतूक पोलीस आणि मृत्यूंजय देवदूत मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
Tal: Rahata, Dist-Ahmednagar. MS. Pin 423109.
Ph: 02423258500 Website: www.sai.org.in

**Saibaba Hospital and Sainath Hospital requires**

| Saibaba Hospital | | | | Sainath Hospital | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr no** | **Name of Post** | **No of post** | | **Sr no** | **Name of Post** | **No of Post** |
| 01 | Medical Director | 01 | | 01 | Medical Superintendent | 01 |
| 02 | Deputy Resident Medical Director | 01 | | 02 | Medical Officer (Physician) | 01 |
| 03 | Medical Administrator | 01 | | 03 | Medical Officer(Ophthalmologist) | 01 |
| 04 | Physician | 03 | | 04 | Medical Officer (Anesthesia) | 01 |
| 05 | Neurologist | 02 | | 05 | Chief Blood Transfusion Officer | 01 |
| 06 | Gastroenterologist | 01 | | 09 | Junior Anesthesiologist | 01 |
| 07 | Junior Radiologist | 01 | | 10 | Medical Officer (Sonologist) | 01 |
| 08 | Casualty Medical Officer | 06 | | 11 | Blood Transfusion Officer | 02 |
| 09 | R.M.O. | 07 | | 12 | Casualty Medical Officer (CMO) | 01 |
| | | | | 13 | Resident Medical Officer (RMO) | 03 |

- वरील सर्व पदे ही ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात येतील.
- उमेदवारांस संस्थान संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मसुद्याप्रमाणे अर्ज करावा.
- उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत शैक्षणिक व अनुभवाचे मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे घेऊन यावे. सदर कागदपत्रे मुलाखतीचेवेळी तपासण्यात येतील.
- उमेदवारांची निवड ही संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) नमुद केलेल्या गुण तालीकेच्या आधारे करणेत येईल.
- कोणत्याही पदासाठी उमेदवार कमी असतील व अनुभव जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे नसल्यास सदर पदासाठी उपस्थित उमेदवारांकरीता निकष व अनुभव शिथील करण्यात येवुन त्याखालील वेतनश्रेणी/ग्रेड पे (एकत्रित वेतन) देणेत येईल.
- वेतन, प्रोत्साहन भत्ता, पात्रता, अनुभव, वय व इतर आवश्यक सविस्तर माहितीकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ला भेट द्यावी.
- सर्व कागदपत्रांसह अर्ज १० दिवसांच्या आत करावा.

**(Bhagyashree Banayat, I.A.S.)**
**Chief Executive Officer**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. महादेव दिनकर कोळी यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे–दुंदरे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २/६ | ०–२५–०० पो.ख. ०–००–५० **एकूण ०–२५–५०** | १.३७ |
| ३/३ | ०–२८–०० पो.ख. ०–०२–०० **एकूण ०–३०–००** | ०.५३ |


वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री. देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०२/१२/२०२१.

**सही/–**
**ॲड. संदिप बटवाल**

कार्यालय : १०३, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. 09869479211

# दुसऱ्या कसोटीवर अवकाळी पावसाचे सावट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत-न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यावर अवकाळी पावसाचा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर शुक्रवारी (दि. ३) ही लढत नियोजित आहे, मात्र अवघा एक दिवस शिल्लक असतानाच पावसाचे सावट कायम आहे.

मुंबईत बुधवारी जवळपास संपूर्ण दिवसभर पावसाची संततधार सुरू राहिली. त्यामुळे दोन्ही संघांचे सराव सत्र रद्द करण्यात आले. वानखेडे स्टेडियमची खेळपट्टीसुद्धा पूर्णपणे झाकून ठेवण्यात आली असून काही ठिकाणी पाण्याचे डबके तयार झाल्याचेही निदर्शनास आले. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार आणखी पावसाची शक्यता आहे.

उभय संघांतील दुसऱ्या कसोटीला शुक्रवारपासून प्रारंभ होणार असून त्या दिवशीही पावसामुळे काही षटकांचा खेळ वाया जाण्याची चिन्हे दिसत आहेत, तर शनिवारपासून आकाश निरभ्र असेल, अशी आशा आहे.

# टीम इंडियाचा आफ्रिका दौरा लांबणीवर?

## ‘ओमायक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयचा सावध पवित्रा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोरोनाचा नवा ओमायक्रॉन विषाणूचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने भारतीय क्रिकेट संघाचा दक्षिण आफ्रिकेचा दौरा किमान एका आठवड्याने पुढे ढकलण्यात आला आहे. वृत्तानुसार भारतीय क्रिकेट नियमक मंडळ म्हणजेच बीसीसीआय क्रिकेट साऊथ आफ्रिकेच्या अधिकाऱ्यांशी या संदर्भात चर्चा करीत आहेत. भारताच्या द. आफ्रिका दौऱ्याच्या वेळापत्रकामध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारत अ संघ सध्या दक्षिण आफ्रिकेमध्येच आहे. सध्या या दौऱ्याच्या नियोजित वेळापत्रकानुसार सामने खेळवले जात असले, तरी भारताच्या मुख्य संघाच्या नियोजित दौऱ्यामध्ये ‘ओमायक्रॉन’च्या प्रादूर्भावाच्या दृष्टीने बदल करण्याचा बीसीसीआयचा विचार आहे. भारतीय संघ नियोजित वेळापत्रकानुसार ९ डिसेंबर रोजी चार्टड विमानाने दक्षिण आफ्रिकेला रवाना होणार होता, मात्र सध्या या नियोजित वेळपत्रकातील कार्यक्रम आणि डिपार्चर स्थगित करण्यात आल्याची माहिती बीसीसीआयच्या सूत्रांनी दिली.



या दौऱ्याच्या वेळापत्रकामध्ये बदल झाल्यामुळे संघामध्येही बदल होणार आहेत. भारत आणि न्यूझीलंडदरम्यान सध्या सुरू असणाऱ्या कसोटी मालिकेच्या पहिल्या सामन्याच्या कालावधीमध्ये निवड समितीची दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी संघ निवड करण्यासाठी बैठक होणार होता, पण सध्या बीसीसीआय दक्षिण आफ्रिकन क्रिकेट बोर्डाच्या संपर्कात असून तेथील कोरोना संसर्गाच्या परिस्थितीचा अंदाज घेत आहेत. हे चित्र पूर्ण स्पष्ट झाल्यानंतरच निवड समितीची बैठक घेतली जाणार आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यात भारतीय संघ तीन कसोटी सामने, तीन एकदिवसीय सामने आणि चार टी-२० सामने खेळणार आहे. सप्टेंबर महिन्यात भारतीय संघाने इंग्लंडमधील मँचेस्टर येथे पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटचा सामना खेळण्यास नकार दिला होता. संघातील सपोर्टिंग स्टाफपैकी काही जणांना कोरोना संसर्ग झाल्याने संघाने शेवटची कसोटी खेळण्यास नकार दिला होता. इंग्लंडवरून सर्व भारतीय खेळाडू थेट यूएईमध्ये आयोजित आयपीएलच्या उर्वरित स्पर्धेसाठी दाखल झाले होते.

### दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू आशावादी

**जोहान्सबर्ग :** ओमायक्रॉन या कोरोना विषाणूच्या नव्या उत्परिवर्तनामुळे भारताच्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर कोणताही परिणाम होणार नाही, असा आशावाद आफ्रिकेचे अनुक्रमे कसोटी आणि मर्यादित षटकांच्या सामन्यांत नेतृत्व करणारे डीन एल्गार आणि तेम्बा बव्हुमा यांनी व्यक्त केला आहे. आफ्रिका क्रिकेट मंडळ जैव-सुरक्षित परिघाची उभारणी करून दोन्ही संघांतील खेळाडूंच्या आरोग्याची काळजी घेईल, असेही मत दोन्ही कर्णधारांनी मांडले. भारतीय संघ आफ्रिका दौऱ्यावर तीन कसोटी, तीन एकदिवसीय आणि चार ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. उभय संघांतील पहिल्या कसोटीला १७ डिसेंबरपासून प्रारंभ होणार आहे. त्यानंतर अनुक्रमे एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० मालिका खेळवण्यात येईल.



## रायगडच्या विघ्नेश पाटीलची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडचा विघ्नेश पाटील (पनवेल) याची १६ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या मुलांच्या १६ वर्षांखालील विजय मर्चंट चषक स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार आहे. याकरिता महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने १६ वर्षांखालील मुलांची आमंत्रित संघांची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत खेळण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने निवडलेल्या संघात विघ्नेश पाटील यांची निवड करण्यात आली होती. रायगड जिल्ह्याच्या संघातून खेळताना विघ्नेशने चांगली कामगिरी केली. त्यामुळे त्याची महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे.

## आरोग्य प्रहर

### आरोग्यासाठी पालक फायदेशीर

हिवाळा हा खाण्या-पिण्यासाठी उत्तम मानला जातो. या हंगामात भरपूर ताज्या हिरव्या पालेभाज्या मिळतात, ज्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. यामध्ये पालकचे नाव सर्वांत वर येते. पालकमध्ये सर्व आवश्यक पोषक घटक असतात आणि शरीराला यातून ताकद मिळते. चला जाणून घेऊया पालक खाल्ल्याने कोणते फायदे होतात.



**डोळ्यांसाठी फायदेशीर** - पालकमध्ये झेक्सॅन्थिन आणि ल्युटीन भरपूर प्रमाणात असते. त्यामध्ये कॅरोटीनॉइड्स असतात, जे डोळ्यांना होणाऱ्या कोणत्याही नुकसानीपासून संरक्षण करतात. अनेक अभ्यासांनुसार झेक्सॅन्थिन आणि ल्युटीन डोळ्यांना मोतीबिंदूपासून वाचवतात. पालकामध्ये आढळणारे व्हिटॅमिन ‘ए’ श्लेष्मल त्वचा टिकवून ठेवण्यास मदत करते, जे दृष्टीसाठी आवश्यक आहे.

**कर्करोग प्रतिबंधित करते** - पालक खाण्यामुळे कर्करोगाच्या वाढीचा वेग मंदावतो. एका अभ्यासानुसार ही संयुगे ट्यूमरचा आकार कमी करण्याचे काम करतात. पालक पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाची शक्यतादेखील कमी करतो. याशिवाय पालकमुळे ब्रेस्ट कॅन्सरपासूनही बचाव होतो. प्राण्यांवर केलेल्या एका अभ्यासानुसार पालक कर्करोगाच्या गाठीदेखील कमी करण्यास मदत करतो. पालकामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात, जे कॅन्सरशी लढण्यास मदत करतात.

**रक्तदाबावर फायदेशीर** - पालकमध्ये भरपूर नायट्रेट असते, ज्यामुळे रक्तदाबाची पातळी संतुलित राहते आणि हृदयविकारापासून बचाव होतो. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, पालक खाल्ल्याने रक्तदाबाची पातळी प्रभावीपणे कमी होते. त्यामुळे हृदय निरोगी राहते. पालकामध्ये पोटॅशियम भरपूर असते आणि सोडियमचे प्रमाण खूप कमी असते. त्यामुळे रक्तदाबाच्या रुग्णांनी पालक जरूर खाल्ला पाहिजे.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवतो** - हिवाळ्याच्या मोसमात लोकांना सर्दी-खोकल्याचा त्रास होतो. पालक रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करतो. आरोग्य तज्ज्ञ हिवाळ्यात अधिकाधिक पालक खाण्याचा सल्ला देतात. त्यात केवळ बीटा-कॅरोटीनच समृद्ध नाही, तर त्यात सर्व आवश्यक अँटीऑक्सिडंट्सदेखील असतात. त्यात व्हिटॅमिन सीदेखील भरपूर आहे, जे शरीराला संक्रमणाशी लढण्यास मदत करते.

**हिमोग्लोबिन वाढवतो** - ज्या लोकांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आहे त्यांनी आपल्या आहारात पालकाचा समावेश करावा. पालकामध्ये भरपूर प्रमाणात फोलेट असते. जे लाल रक्तपेशी वाढवण्यासाठी आवश्यक मानले जाते.

### कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धा

## भारताची उपांत्य फेरीत धडक

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

शरदानंद तिवारीने केलेल्या गोलच्या जोरावर भारताने बलाढ्य बेल्जियमवर १-० अशी सरशी साधत कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. या फेरीत गतविजेत्या भारतापुढे शुक्रवारी (दि. ३) जर्मनीचे आव्हान असेल.

लखनऊ येथे २०१६ साली झालेल्या मागील कनिष्ठ विश्वचषकात भारताने बेल्जियमलाच धूळ चारत दुसऱ्यांदा जगज्ञेते होण्याचा मान मिळवला होता. या पराभवाची परतफेड करण्यासाठी बेल्जियमचा युवा संघ उत्सुक होता, परंतु भारताने शरदानंदचा गोल, भक्कम बचाव आणि राखीव गोलरक्षक पवनच्या उत्कृष्ट खेळामुळे पुन्हा बेल्जियमवर वर्चस्व गाजवले.

भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियमवर झालेल्या या उपांत्यपूर्व फेरीतील सामन्याच्या सुरुवातीला बेल्जियमने आक्रमक शैलीत खेळ केला, मात्र त्यांचे आक्रमण थोपवण्यात भारताच्या बचाव फळीला यश आले. पहिल्या सत्रात भारताच्या उत्तम सिंगने गोल करण्याचा प्रयत्न केला, पण त्याने मारलेला फटका बेल्जियमचा गोलरक्षक बोरिस फेल्डहॅमने अडवला. भारताला दुसऱ्या सत्रात २१व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावर शरदानंदने गोल केल्यामुळे यजमानांना १-० अशी आघाडी मिळाली. मध्यंतरानंतर बेल्जियमच्या आक्रमणाला अधिक धार आली. त्यातच भारताने चेंडूवर ताबा ठेवण्याच्या प्रयत्नात चुका केल्या. चौथ्या सत्रात प्रशांत चौहानच्या जागी मैदानात आलेल्या राखीव गोलरक्षक पवनने रोमन दुवेकोट आणि डीने डी विंटरला गोल करण्यापासून रोखत भारताला सामना जिंकवून दिला.

## जागतिक स्पर्धेत सिंधूला पुढे चाल

**व्हेल्वा (स्पेन) : वृत्तसंस्था**

गतविजेत्या पी. व्ही. सिंधूला आगामी जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली आहे. उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेरीत तिच्यापुढे अनुक्रमे ताइ झू यिंग आणि कॅरोलिना मरिन यांचे आव्हान असू शकेल.


स्पेनमध्ये १२ ते १९ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या जागतिक स्पर्धेत सिंधूचा दुसऱ्या फेरीत स्लोव्हेनियाची मार्टिना रेपिस्का आणि इंडोनेशियाच्या रुसेल्ली हार्तवान यांच्यातील विजेत्याशी सामना होईल. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत श्रीकांतपुढे पाब्लो एबियन, तर लक्ष्य सेनपुढे मॅक्स वेसकिर्चेनचे आव्हान आहे.

### जागतिक बॅडमिंटन मालिकेचा अंतिम टप्पा

# सिंधू, श्रीकांतची विजयी सलामी

**बाली : वृत्तसंस्था**

आघाडीचे भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि किदाम्बी श्रीकांत यांनी जागतिक मालिकेच्या अंतिम टप्प्याचा (वर्ल्ड टूर फायनल्स) विजयी प्रारंभ केला. सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी, अश्विनी पोनप्पा आणि एन. सिक्की रेड्डी या जोड्यांना मात्र पराभव पत्करावा लागला.



दोन ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूने अ-गटातील पहिल्या लढतीत डेन्मार्कच्या लिन ख्रिस्टोफर्सनला २१-१४, २१-१६ असे सरळ गेममध्ये पराभूत केले. पहिल्या गेममध्ये ६-८ असे पिछाडीवर पडल्यानंतर सिंधूने सलग १० गुण मिळवत वर्चस्व प्रस्थापित केले. मग तिने पहिला गेम २१-१४ असा जिंकला. दुसऱ्या गेममध्ये मध्यंतराला सिंधूकडे ११-१० अशी केवळ एका गुणाची आघाडी होती. त्यानंतर तिने आक्रमक खेळ करीत हा गेम पाच गुणांच्या फरकाने जिंकला.

पुरुष एकेरीच्या ब-गटात जागतिक क्रमवारीतील माजी अव्वल खेळाडू श्रीकांतने फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हवर २१-१४, २१-१६ अशी मात केली. बुधवारी त्याचा तीन वेळच्या माजी कनिष्ठ विश्वविजेत्या थायलंडच्या कुंलावत वितिस्नशी होईल, तसेच जागतिक क्रमवारीतील अग्रस्थानी असलेल्या केंटो मोमोटाने दुखापतीमुळे माघार घेतल्यामुळे लक्ष्यला विजय मिळाला.

महिला दुहेरीच्या ब-गटातील पहिल्या साखळी सामन्यात अश्विनी-सिक्की रेड्डीला नामी मात्सुयामा आणि चिहारू शिडा या दुसऱ्या मानांकित जपानी जोडीकडून १४-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत सात्त्विक-चिरागवर किम अॅस्ट्रप आणि आंद्रेस रॅस्मसन या डेन्मार्कच्या जोडीने १६-२१, ५-२१ अशी मात केली. सात्त्विक-चिराग यांना गेल्या आठवड्यात झालेल्या इंडोनेशिया खुल्या स्पर्धेत त्यांना उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला. त्यानंतरही जागतिक मालिकेच्या अंतिम टप्प्यासाठी प्रथमच पात्र ठरण्यात ही भारतीय जोडी यशस्वी ठरली.

## महत्त्वाच्या खेळाडूंना रिटेन करू न शकल्याने रोहित शर्मा हताश



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पुढील म्हणजेच २०२२च्या पर्वाआधी अनेक संघांनी आपल्या महत्त्वाच्या खेळाडूंना करारमुक्त केले आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार रोहित शर्माला संघाने पुन्हा एकदा रिटेन केले आहे, मात्र महत्त्वाच्या खेळाडूंना रिटेन करू न शकल्याने रोहित नाराज आहे. हे फारच मन दुखावणारे असल्याचे त्याने म्हटले आहे.

मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाने चार खेळाडूंना रिटेन केले असून यामध्ये रोहितचा समावेश आहे. रोहितसोबत जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि किएरॉन पोलार्डला रिटेन करण्यात आले आहे. एखादा संघ चारपेक्षा जास्त खेळाडू रिटेन करू शकत नाही.

ज्या खेळाडूंना मुंबई इंडियन्स रिटेन करू शकले नाही त्यात हार्दिक पांड्या, कृणाल पांड्या, इशान किशन, बोल्ट यांचा समावेश आहे. यावर बोलताना रोहित म्हणाला की, त्यांनी संघासाठी खूप मेहनत घेतली असून अनेक आठवणी तयार केल्या आहेत. त्यामुळे त्यांना जाऊ देणे फार अवघड निर्णय होता. लिलावातून आम्ही पुन्हा एकदा ती कोअर टीम तयार करू अशी आशा आहे.


## इंग्लंडचा फिरकीपटू जॅक लीच पाहतोय रवींद्र जडेजाचे व्हिडीओ

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा फिरकीपटू जॅक लीचने तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अॅशेस मालिकेसाठी तयारी करीत आहे आणि त्यासाठी भारताचा फिरकीपटू अष्टपैलू रवींद्र जडेजाचे व्हिडीओ पाहत असल्याचे म्हटले आहे. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियात झालेल्या कसोटी मालिकेत भारतीय संघाच्या दमदार कामगिरीदरम्यान जडेजाच्या गोलंदाजीने लीच प्रभावित झाला होता.

लीचने इंग्लंडकडून १६ कसोटी सामन्यांत ६१ बळी घेतले आहेत, पण तो ऑस्ट्रेलियात एकही कसोटी सामना खेळलेला नाही. अॅशेल मालिकेच्या पार्श्वभूमीवर लीच म्हणाला की, मला वाटत नाही की तो (जडेजा) भारतात जे करतो त्यापेक्षा थोडे वेगळे काही केले. पाहून छान वाटले. तो जे करतो ते त्याने केले आणि यश मिळवले. लीचने असेही सांगितले की ऑस्ट्रेलियाचा नॅथन लियॉनही प्रभावी ठरला आहे आणि येथील परिस्थितीमध्ये हा ऑफस्पिनर कसा गोलंदाजी करतो याकडे त्याचे लक्ष आहे.

### अॅशेस मालिकेची तयारी



दरम्यान, अॅशेस मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाचा १५ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला आहे. कसोटी पदार्पण करण्यासाठी सज्ज असलेल्या या संघात यष्टिरक्षक फलंदाज अॅलेक्स कॅरीचाही समावेश करण्यात आला आहे. टीम पेन गेल्या काही वर्षांपासून ऑस्ट्रेलियासाठी कसोटी यष्टिरक्षक म्हणून काम करीत आहे, पण एका प्रकरणानंतर त्याने प्रथम कर्णधारपद सोडले आणि नंतर क्रिकेटमधून अनिश्चित काळासाठी ब्रेक घेतला. आता पॅट कमिन्स ऑस्ट्रेलियन संघाचा कर्णधार आहे, तर स्टीव्ह स्मिथ उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे.

## पारस म्हांब्रे म्हणतात, संघ रहाणे-पुजाराच्या पाठीशी!

**मुंबई :** येथील वानखेडे स्टेडियमवर शुक्रवार (दि. ३)पासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पार्श्वभूमीवर संघनिवडीचा पेच निर्माण झाला आहे. कर्णधार विराट कोहलीचे पुनरागमन आणि श्रेयस अय्यरचे नेत्रदीपक पदार्पण यामुळे धावांसाठी झगडणाऱ्या अजिंक्य रहाणे, चेतेश्वर पुजारा आणि सलामीवीर मयांक अगरवाल यांच्यापैकी एकाला वगळण्याची शक्यता आहे, परंतु रहाणे-पुजाराच्या कामगिरीची कोणतीही चर्चा झाली नसून संघ त्यांच्या पाठीशी आहे, असे स्पष्टीकरण गोलंदाजीचे प्रशिक्षक पारस म्हांब्रे दिले आहे.



**पनवेल :** गव्हाण येथील हसन इस्माईल शेख यांची कन्या शिरीन हिचा विवाह गुरुवारी झाला. लग्नाच्या पूर्वसंध्येला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शेख कुटुंबीयांची भेट घेऊन शिरीनला विवाहानिमित्त शुभेच्छा दिल्या. सोबत हसन शेख व जयवंत देशमुख.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com